cmyk

## संपादकीय

### आरसा दाखवणारा नागरिक की संशयित विरोधक?

भारतीय लोकशाहीची ताकद केवळ नियमित निवडणुकांमध्ये नाही, तर सत्तेला प्रश्न विचारण्याच्या नागरिकांच्या अधिकारात आहे. मतदान हा लोकशाहीचा पाया असला, तरी सरकारच्या निर्णयांवर टीका करणे, धोरणांची चिकित्सा करणे आणि सार्वजनिक उत्तरदायित्वाची मागणी करणे हीदेखील लोकशाहीची तितकीच महत्त्वाची मूल्ये आहेत. त्यामुळे आजचा मूलभूत प्रश्न असा आहे की, भारतात सरकारवर टीका करणाऱ्यांकडे संशयाने पाहिले जाते का, की हा केवळ राजकीय संघर्षाचा भाग आहे?

दैनिक www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१०६ | सोमवार दि.०६ जुलै २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

# कर्जमाफीची रक्कम खात्यात जमा होईपर्यंत व्याज आकारणी नाही

## सरकारचे स्पष्ट आदेश, शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील पात्र शेतकऱ्यांना मोठा दिलासा

मुंबई । प्रतिनिधी

**राज्य सरकारच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजने अंतर्गत पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना महत्त्वाचा दिलासा देत सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने बँका तसेच विविध कार्यकारी सहकारी संस्थांना स्पष्ट निर्देश जारी केले आहेत. कर्जमाफीची रक्कम प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात जमा होईपर्यंत थकीत पीककर्जाच्या रकमेवर कोणत्याही प्रकारची व्याज आकारणी करू नये, असे आदेश शासनाने दिले आहेत. शासनाच्या या निर्णयामुळे कर्जमाफीच्या प्रतीक्षेत असलेल्या लाखो शेतकऱ्यांवरील अतिरिक्त आर्थिक भार टळणार असून, कर्जमाफीचा लाभ मिळेपर्यंत वाढणाऱ्या व्याजाच्या चिंतेतून त्यांची सुटका होणार आहे.**




राज्य सरकारने जाहीर केलेल्या या योजनेअंतर्गत ३० जून २०२५ पर्यंत थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली पीककर्जे कर्जमाफीसाठी पात्र मानण्यात आली आहेत. या निकषांची पूर्तता करणाऱ्या शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतच्या पीककर्जाची माफी दिली जाणार आहे. ज्या शेतकऱ्यांचे पीककर्ज दोन लाख रुपयांपेक्षा अधिक आहे, त्यांना अतिरिक्त रक्कम स्वतः भरल्यानंतर एकवेळ समझोता योजनेचा लाभ घेता येणार आहे. त्यामुळे मोठ्या कर्जदार शेतकऱ्यांनाही दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. याशिवाय, नियमितपणे पीककर्जाची परतफेड करणाऱ्या शिस्तबद्ध शेतकऱ्यांनाही सरकारने प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेतला आहे. अशा पात्र शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे. त्यामुळे वेळेवर कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही या योजनेत न्याय मिळणार आहे. दरम्यान, कर्जमाफीची घोषणा झाल्यानंतर प्रत्यक्ष निधी खात्यात जमा होण्यासाठी काही कालावधी ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### बाल लैंगिक अत्याचाराच्या जाहिराती थांबवा–केंद्र सरकार

दिल्लीः इन्स्टाग्रामवर बाल लैंगिक शोषणाला खतपाणी घालणाऱ्या जाहिराती दाखवल्या जात असल्याच्या धक्कादायक प्रकारानंतर केंद्र सरकारने कठोर पाऊल उचलले आहे. केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने या प्रकरणी मेटा कंपनीला नोटीस बजावली असून, अशा जाहिराती आणि मजकूर तातडीने ब्लॉक करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच, या गंभीर प्रकरणावर ७ दिवसांत सविस्तर स्पष्टीकरण सादर करण्याचे निर्देशही सरकारने कंपनीला दिले आहेत. केंद्र सरकारच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, इन्स्टाग्रामवरील ज्या जाहिराती युजर्सना बाल लैंगिक शोषणाचा मजकूर असलेल्या बाह्य प्लॅटफॉर्मवर घेऊन जातात, त्या सर्व जाहिरातींवर तात्काळ बंदी घालण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

### श्री राम क्षेत्र ट्रस्टला आरटीआय अंतर्गत आणा

दिल्लीः भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे (मार्क्सवादी) (सीपीआय–एम) राज्यसभा खासदार जॉन ब्रिटास यांनी केंद्र सरकारला, अयोध्येतील राम मंदिर परिसराचे व्यवस्थापन करणाऱ्या श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टला माहिती अधिकार कायद्याच्या (आरटीआय) कक्षेत आणण्यावर पुनर्विचार करण्याचे आवाहन केले आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना लिहिलेल्या पत्रात ब्रिटास यांनी म्हटले आहे की, ट्रस्टला आरटीआय कायद्याच्या कक्षेत आणल्यास पारदर्शकता आणि सार्वजनिक उत्तरदायित्व सुनिश्चित होईल. राम मंदिराला भाविकांनी दिलेल्या देणग्यांच्या कथित अपहाराच्या वादाच्या पार्श्वभूमीवर ही मागणी करण्यात आली आहे.

### नैसर्गिक वायूचा पुरवठा पुर्ववत

दिल्लीः पश्चिम आशियातील तणाव कमी झाल्यानंतर आणि स्ट्रेट ऑफ होर्मुजमधून एलपीजी (लिक्विफाइड नॅशनल गॅस)चा पुरवठा पूर्ववत झाल्यानंतर केंद्र सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे. सरकारने नैसर्गिक वायूच्या पुरवठ्यावर लागू केलेले बहुतांश आपत्कालीन निर्बंध आता पूर्णपणे मागे घेतले आहेत. केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने अधिसूचना जारी करून नैसर्गिक वायू (पुरवठा नियमन) आदेश, २०२६ मध्ये सुधारणा केली असून, याअंतर्गत गॅस पुरवठ्याबाबतचे कडक नियम शिथिल करण्यात आले आहेत. पश्चिम आशियातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने ९ मार्च २०२६ रोजी आवश्यक वस्तू कायद्यांतर्गत ही आपत्कालीन व्यवस्था लागू केली होती. अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यांनंतर आणि त्यास इराणकडून दिलेल्या प्रत्युत्तरामुळे स्ट्रेट ऑफ होर्मुझमधून एलपीजी वाहतुकीवर परिणाम झाला होता.

## पक्ष बदलण्यासाठी काँग्रेसच्या आमदाराला २० कोटीची ऑफर

### संजय राऊत यांच्या दाव्याने खळबळ, मात्र आमदाराने दावा फेटाळला

मुंबई । प्रतिनिधी

काँग्रेसचे आमदार धीरज लिंगाडे यांना पक्ष बदलण्यासाठी २० कोटी रुपयांची ऑफर देण्यात आली होती, असा दावा ठाकरेसेना नेते जय राऊत यांनी रविवारी केला. मात्र, संबंधित आमदारानेच हा आरोप फेटाळून लावला आहे.



राऊत यांनी याबद्दल अधिक तपशील दिला नाही, तसेच लिंगाडे यांना पैशांची ऑफर कोणी दिली आणि आमदाराला कोणत्या पक्षात जायचे होते, याचाही उल्लेख केला नाही. तुम्ही पक्षाचे कार्यकर्ते, खासदार आणि आमदार फोडत आहात. लिंगाडे नावाच्या एका व्यक्तीला २० कोटींची ऑफर देण्यात आली होती. ही माझी माहिती आहे, असा दावा राऊत यांनी केला. कुठे थांबायचे हे ज्यांना समजत नाही, त्यांचा शेवट अत्यंत दुःखद असतो. हे सर्व राजकारण्यांना लागू होते. कुठेतरी थांबणे गरजेचे आहे, असे राऊत यांनी म्हटले. पत्रकारांशी बोलताना लिंगाडे यांनी अशी कोणतीही ऑफर मिळाल्याचे नाकारले आणि राऊत यांनी केलेल्या दाव्याबद्दल ▶▶ पान २ वर

## राज्याच्या राजकारणात आठ दिवसांत मोठा भूकंप

### ठाकरे सेनेचे १४ आमदार शिंदे सेनेत जाणार, आमदाराच्या दाव्याने खळबळ

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यात 'ऑपरेशन टायगर ३' राबवले जाणार असल्याची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. याबाबत एकनाथ शिंदे यांच्या अत्यंत विश्वासू नेत्याने एक मोठी अपडेट दिली असून, येत्या आठ दिवसांत ठाकरे गटातील तब्बल १४ आमदार शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश करणार असल्याचा खळबळजनक दावा केल्यामुळे राजकीय वर्तुळातील उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.**




राज्यातील राजकारणात गेल्या १५ दिवसांपासून अत्यंत वेगवान घडामोडी घडत असून संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष या राजकीय घडामोडींकडे लागले आहे. गेल्या अवघ्या दहा दिवसांत राज्यात मोठी राजकीय उलथापालथ झाल्याचे समोर आले आहे. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे सहा खासदार फुटून त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केल्याची घटना ताजी असतानाच, आदित्य ठाकरे यांचे अत्यंत निकटवर्तीय मानले जाणारे ▶▶ पान २ वर

## बीड झेडपीत अधिकाऱ्याविरुद्ध अधिकाऱ्यांच्याच बनावट तक्रारी

### तक्रारदाराच्या खुलाशाने खळबळ, सीईओंची चौकशी करणार कनिष्ठ कर्मचारी

बीड । प्रतिनिधी

**बीड जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा योजनेतील कथित घोटाळ्याच्या संदर्भात एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ज्या तक्रारीच्या आधारे जिल्हा परिषदेने वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या चौकशीसाठी समिती गठीत केली होती, ती मूळ तक्रारच आपण केलेली नसल्याचा दावा खुद्द तक्रारदारानेच केला आहे. या प्रकारामुळे जिल्हा परिषद प्रशासनात मोठा गोंधळ उडाला असून, प्रशासकीय कामकाजावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत.**




सामाजिक कार्यकर्ते राम सूर्यभान खाडे यांच्या नावे १८ सप्टेंबर २०२५ रोजी मुख्यमंत्री आणि मुख्य सचिवांकडे एक तक्रार अर्ज करण्यात आला होता. यामध्ये तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवणे (भा.प्र.से.) आणि प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावर जलजीवन मिशन अंतर्गत आर्थिक गैरव्यवहाराचे गंभीर आरोप करण्यात आले होते. या तक्रारीची दखल घेत जिल्हा परिषदेने या प्रकरणाच्या चौकशीसाठी एक समिती गठीत केली होती. या सर्व प्रकारानंतर तक्रारदार राम खाडे यांनी जिल्हा ▶▶ पान २ वर

### सीईओंना अधिकाराचा विसर

एका बाजूला तक्रारदारच ही तक्रार खोटी असल्याचे म्हणत असताना, दुसऱ्या बाजूला जिल्हा परिषदेने या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे. नियमानुसार, आयएएस दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या चौकशीसाठी वरिष्ठ आयएएस अधिकारी असणे आवश्यक असते. मात्र, कनिष्ठ कर्मचाऱ्यांना चौकशी अधिकारी म्हणून नेमल्यामुळे जिल्हा परिषदेच्या या निर्णयावर आता टीका होत असून, प्रशासन स्वमर्जीने चौकशी करत असल्याची चर्चा दबक्या आवाजात सुरू आहे.

## विद्यार्थ्यांच्या सुरक्षित व सुलभ शिक्षणप्रवासासाठी एसटी कटिबद्ध



मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची 'लालपरी' ही केवळ प्रवासी वाहतुकीचे साधन नसून राज्यातील लाखो शालेय विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची, सुरक्षिततेची आणि उज्ज्वल भविष्याची विश्वासू जीवनवाहिनी बनली आहे. दुर्गम व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षणाची संधी पोहोचविण्याचे सामाजिक दायित्व एसटी महामंडळ अनेक दशकांपासून प्रभावीपणे पार पाडत असल्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

प्रताप सरनाईक पुढे बोलताना म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या ▶▶ पान २ वर

## राम मंदिरातील दान चोरी झांकी असेल तर काशी मथुरा किती लुटतील?

### उद्धव ठाकरेंचा हल्लाबोल, राज्यव्यापी रामरक्षा आंदोलनाला सुरूवात

मुंबई । प्रतिनिधी

बारा वर्ष झालीत, आज आपण ज्यासाठी मेहनत केली होती, ती व्यक्ती पंतप्रधानपदी बसली आणि बसल्यानंतर कट्टर, कडवट हिंदुत्ववादी शिवसेनेला नष्ट करण्यासाठी जणू काही अफजलाखानी विडा उचलला. का उचलला कारण हिंदुत्वाचा गैरफायदा घ्यायचा होता. हिंदुत्वाचा गैरफायदा घेताना शिवसैनिक, एकच शिवसेना देशात अशी आहे, समोर उभी राहून निधड्या छातीने त्यांना प्रश्न विचारु शकेल. काय वातावरण होते, अयोध्या तो झांकी है, काशी मुथरा बाकी है. मला आता ▶▶ पान २ वर




## राज्य महामार्गांवर आधुनिक जनसुविधा केंद्रांची उभारणी; पीडब्ल्यूडीच्या प्रकल्पाला गती

पुणे । प्रतिनिधी

राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (पी. डब्ल्यू. डी.) अखत्यारीतील असलेल्या राज्य महामार्ग आणि प्रमुख जिल्हा मार्गांवर प्रवाशांसाठी आधुनिक जनसुविधा केंद्र (प्रसाधनगृहे) उभारण्याच्या कामाला गती देण्यासाठी राज्य शासनाने मार्गदर्शक सूचना ▶▶ पान २ वर



## अर्ध्या राज्याला पावसाने झोडपले!

### मुंबईत ३०० मिमी, तर माथेरानमध्ये ४०८ मिमी पावसाची नोंद

मुंबई । प्रतिनिधी

**गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने अर्ध्या राज्याला अक्षरशः झोडपून काढले आहे. मुंबई, कोकणासह विदर्भातील अनेक भागाला रविवारी जोरदार मुसळधार पावसाने झोडपले आहे. अनेक भागात रस्त्यांना नद्यांचे स्वरुप आले होते. मोठ्या प्रमाणात रस्त्यावर पाणी साचले होते.**



मुंबई, नालासोपारा, भिवंडी, ठाणे, पुणे, नाशिक, रत्नागिरी, पालघर, अमरावती, अकोला कोल्हापूर, या शहरात जोरदार पाऊस सुरु आहे. त्यामुळे येथील अनेक नद्यांना पूर आले आहेत. रस्त्यावर पाणीच पाणी दिसत आहेत. तसेच, वादळी वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी झाडे कोसळल्याच्या घटनासमोर आल्या आहेत. मुंबईत २४ तासांत अनेक भागांत २०० मिमीपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली, तर काही भागांत तब्बल ३०० मिमी पावसाची नोंद झाली आहे. आज सकाळी मेट्रो आणि बेस्ट बसेससह सार्वजनिक वाहतूक सेवा सुरळीत सुरू होत्या. रायगड जिल्ह्यात सरासरी २१५.४५ मिमी पावसाची नोंद झाली आहे. ▶▶ पान २ वर

## प्रशांत किशोर लढविणार पोटनिवडणूक, भाजपला दिले थेट आव्हान

पटणा । वृत्तसंस्था



जनसुराज पक्षाचे संस्थापक प्रशांत किशोर यांनी रविवारी स्वत: पोटनिवडणूक लढवणार असल्याची घोषणा केली. पोटनिवडणुकीच्या रिंगणात उडी घेत त्यांनी भाजपविरोधात दंड थोपटले. भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएची सत्ता असणाऱ्या बिहारच्या बांकीपूर विधानसभा मतदारसंघात ३० जुलैला पोटनिवडणूक होईल.

राज्यसभा खासदार बनल्याने भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी आमदारकीचा राजीनामा दिला. त्यामुळे बांकीपूर मतदारसंघात पोटनिवडणूक होत आहे. आता उमेदवार बनून किशोर त्या पोटनिवडणुकीला सामोरे जाणार आहेत. संबंधित निर्णयाची माहिती किशोर ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०४ जुलै २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: ८३.५० क्विंटल | २,२४१ | २,६०० | २,४७० |
| ज्वारी/हायब्रिड: ४२.५० क्विंटल | २,३०० | ४,५६० | ३,०५१ |
| मका/लोकल: ४०.५० क्विंटल | २,२०० | २,२५६ | २,२२८ |
| तूर : १३.५० क्विंटल | ७,५५१ | ७,५५१ | ७,५५१ |
| उडीद : ०.५० क्विंटल | ५,८०० | ५,८०० | ५,८०० |
| बाजरी: २५.०० क्विंटल | २,४११ | ३,३०१ | २,७०० |
| मुग: ४.०० क्विंटल | ७,००१ | ७,००१ | ७,००१ |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | ६,६०० | ६,६०० | ६,६०० |
| हरभरा: ६.५० क्विंटल | ५,५०० | ५,५५२ | ५,५२६ |

cmyk

cmyk



## अग्रलेख

# आरसा दाखवणारा नागरिक की संशयित विरोधक?

भारतीय लोकशाहीची ताकद केवळ नियमित निवडणुकांमध्ये नाही, तर सत्तेला प्रश्न विचारण्याच्या नागरिकांच्या अधिकारात आहे. मतदान हा लोकशाहीचा पाया असला, तरी सरकारच्या निर्णयांवर टीका करणे, धोरणांची चिकित्सा करणे आणि सार्वजनिक उत्तरदायित्वाची मागणी करणे हीदेखील लोकशाहीची तितकीच महत्त्वाची मूल्ये आहेत. त्यामुळे आजचा मूलभूत प्रश्न असा आहे की, भारतात सरकारवर टीका करणाऱ्यांकडे संशयाने पाहिले जाते का, की हा केवळ राजकीय संघर्षाचा भाग आहे?

२०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने पायाभूत सुविधा, डिजिटल प्रशासन, कल्याणकारी योजना, परराष्ट्र धोरण आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या क्षेत्रात अनेक महत्त्वाचे निर्णय घेतल्याचा दावा केला आहे. त्याचवेळी महाराष्ट्रातही महायुती सरकार विकास आणि प्रशासनातील कार्यक्षमतेवर भर देत असल्याचे सांगते. मात्र, याच काळात विरोधी पक्ष, काही पत्रकार, नागरी हक्कांसाठी काम करणाऱ्या संस्था आणि विविध सामाजिक संघटनांनी एक गंभीर प्रश्न उपस्थित केला आहे. त्यांच्या मते, सरकारवर टीका करणाऱ्या व्यक्ती, संस्था किंवा राजकीय विरोधकांवर तपास यंत्रणांच्या कारवाया अधिक प्रमाणात होत असल्याचा आभास निर्माण झाला आहे. केंद्र सरकारने हे आरोप सातत्याने नाकारले असून, सर्व कारवाया कायद्याच्या चौकटीत आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारेच केल्या जात असल्याचे स्पष्ट केले आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम १९(१)(अ) अंतर्गत प्रत्येक नागरिकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार आहे. मात्र, कलम १९(२) राष्ट्रीय सुरक्षा, सार्वजनिक सुव्यवस्था, न्यायालयाचा अवमान, मानहानी आणि इतर मर्यादित कारणांसाठी वाजवी निर्बंध घालण्याची परवानगी देते. त्यामुळे अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे निरंकुश नसून, त्याला घटनात्मक मर्यादा आहेत. खरा वाद हा या मर्यादांचा वापर कसा आणि कितपत केला जातो, यावर केंद्रित आहे. अंमलबजावणी संचालनालय (ईडी), केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय) आणि आयकर विभागाच्या कारवायांवर गेल्या काही वर्षांत मोठी राजकीय चर्चा झाली. विरोधी पक्षांचा आरोप आहे की, या संस्थांचा वापर निवडक राजकीय विरोधकांवर अधिक केला जातो. दुसरीकडे सरकारचे म्हणणे आहे की भ्रष्टाचाराविरुद्ध कारवाई करताना कोणालाही विशेष सवलत दिली जाणार नाही आणि कायद्यापुढे सर्व समान आहेत. या विषयावर विविध न्यायालयांमध्येही अनेक प्रकरणांची सुनावणी सुरू आहे. त्यामुळे अंतिम निष्कर्ष न्यायालयीन प्रक्रियेनंतरच स्पष्ट होऊ शकतो.

अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या संदर्भात माध्यमांची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. काही पत्रकार आणि माध्यम संस्थांनी दबाव, खटले किंवा चौकशीबाबत चिंता व्यक्त केली आहे. जागतिक प्रेस फ्रीडम निर्देशांकात भारताच्या क्रमवारीवरूनही चर्चा झाली. मात्र, केंद्र सरकारने या निर्देशांकाच्या निकषांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत भारतात माध्यमांना व्यापक स्वातंत्र्य असल्याचा दावा केला आहे. त्यामुळे या विषयातही दोन परस्परविरोधी दृष्टीकोन स्पष्टपणे दिसतात. राजकीय संवादातील भाषाशैली हाही चिंतेचा विषय ठरतो. सत्ताधारी आणि विरोधी पक्ष दोघेही अनेकदा एकमेकांवर तीव्र शब्दांत टीका करतात. ''देशविरोधी'', ''भ्रष्टाचार समर्थक'', ''अर्बन नक्षल'', ''अंधभक्त'' किंवा ''टुकडे-टुकडे गँग'' यांसारखी विशेषणे सार्वजनिक चर्चेत सहज वापरली जातात. अशा भाषेमुळे मतभेदांचा संवाद कमी होऊन व्यक्तींचे वर्गीकरण अधिक वाढते. लोकशाहीत विचारांवर टीका होणे स्वाभाविक आहे; परंतु व्यक्तींच्या हेतूंवर सरसकट शंका घेण्याची प्रवृत्ती दीर्घकालीन दृष्टीने लोकशाहीसाठी हितावह ठरत नाही. सोशल मीडियाने प्रत्येक नागरिकाला मत व्यक्त करण्याचे व्यासपीठ दिले आहे. पण त्याचबरोबर चुकीची माहिती, ट्रोलिंग, वैयक्तिक हल्ले आणि ध्रुवीकरण यांचाही वेग वाढला आहे. कोणत्याही राजकीय भूमिकेवर मतभेद व्यक्त केले की लगेच विरोधक किंवा समर्थक अशा चौकटीत व्यक्तीला बसवण्याची प्रवृत्ती वाढत आहे. त्यामुळे तथ्यांवर आधारित सार्वजनिक चर्चा मागे पडते आणि भावनिक ध्रुवीकरण पुढे येते. लोकशाहीमध्ये सरकारवर टीका करणे म्हणजे राष्ट्रविरोधी भूमिका घेणे नव्हे. त्याचप्रमाणे सरकारवर टीका करणारी प्रत्येक भूमिका योग्यच असते, असेही नाही. लोकशाहीचा गाभा म्हणजे पुराव्यावर आधारित वादविवाद, स्वतंत्र न्यायव्यवस्था, मुक्त माध्यमे आणि उत्तरदायी शासन. सरकारला प्रश्न विचारणे हा नागरिकांचा अधिकार आहे, तर त्या प्रश्नांना पारदर्शकपणे उत्तर देणे ही सत्तेची जबाबदारी आहे.

आज भारतासमोरचा खरा प्रश्न कोणता पक्ष सत्तेत आहे हा नाही, तर लोकशाहीतील संवाद किती सशक्त आहे हा आहे. जर सत्ताधारी टीकेला वैचारिक प्रतिसाद देतील आणि विरोधकही तथ्याधारित भूमिका मांडतील, तर लोकशाही अधिक मजबूत होईल. परंतु टीकेला वैयक्तिक शत्रुत्व समजले गेले किंवा प्रत्येक सरकारी निर्णयाला केवळ राजकीय विरोधासाठी विरोध केला गेला, तर लोकशाहीतील विश्वासाचा पाया कमकुवत होऊ शकतो. म्हणूनच लोकशाहीची खरी परीक्षा निवडणुकीच्या दिवशी होत नाही; ती दररोज होते. नागरिक निर्भयपणे प्रश्न विचारू शकतात का, माध्यमे स्वायत्तपणे काम करू शकतात का, न्यायसंस्था स्वतंत्रपणे निर्णय देऊ शकते का आणि सरकार टीकेला उत्तर देण्याची तयारी दाखवते का यावर लोकशाहीची गुणवत्ता ठरते. मजबूत सरकार महत्त्वाचे असतेच; परंतु त्याहून अधिक महत्त्वाची असते ती प्रश्न विचारणाऱ्या, सजग आणि संविधाननिष्ठ नागरिकांची संस्कृती. कारण लोकशाहीत आरसा दाखवणारा नागरिक हा शत्रू नसतो, तर शासन अधिक उत्तरदायी बनवणारा आवश्यक घटक असतो.

# शेतामध्ये लोंबाळेल्या विद्युत तारेला स्पर्श होऊन २६ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू

### चिचोंटी शिवारात काल घडली घटना ; महावितरणाच्या कारभारा विरोधात ग्रामस्थांमधून संताप

**वडवणी । प्रतिनिधी**

**शेतामधील पिकाची हरणानी अवस्था काय केली तसेच फेरफटका मारायला गेलेल्या २६ वर्षीय तरुणाचा लोबाळत असणाऱ्या विजेच्या तारेला स्पर्श होऊन जागीच मृत्यू झाला आहे. हि घटना काल दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास चिचोंटी शिवारातील पांढरी शेती भागात घडली आहे.**



माऊली दिलीप गोंडे वय २६ वर्ष (रा. चिंचोटी ता. वडवणी जि. बीड) असं मयत तरुणाचे नाव आहे. वडिलांचे छत्र लहानपणी हरवले असून पिंपरखेड शिवारात पांढरी या भागात १ ते २ एकर शेती आहे. अल्पभूधारक शेती असणारा हा तरुण शेतकरी शेतीवरच कुटुंबाचा उदाहनिर्वाह भागवत असे. मागील दोन दिवसात या भागात आणि परिसरात चांगला पाऊस झाल्याने शेतात जाऊन फेरफटका व हरणाने शेत पिकाचे नुकसान काय केले का याचा हाल-अहवाल पाहण्यासाठी काल सकाळी १० वाजताच हा तरुण शेतात गेला होता. तर शेतात गेल्यानंतर सगळीकडे फेरफटका मारल्यानंतर महावितरणाच्या विद्युत तारेच्या खाली आला. या तारेचा स्पर्श होऊन त्याचा जागीच मृत्यू झाला. ही घटना काल दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास घडली आहे. तर याबाबत सदरील मयत तरुणाने व शेजारील शेतकऱ्यानी वारंवार महावितरण हि तार व्यवस्थित करून द्या ! असे तोंडी सांगितले होते. तरी देखील मगु महावितरणाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी याकडे कायम दुर्लक्ष केले आहे. यात काल हा अपघात झाला आणि सदरील तरुणाचा जागीच मृत्यू झाला. दोन दिवसांपूर्वी झालेल्या पावसामुळे शेतातही आसपासचे शेतकरी कोणी नव्हते. त्यामुळे या तरुणाला कधी तारेचा स्पर्श झाला हे कळू शकले नसले तरी काल दुपारी बारा वाजता शेतातून जाणाऱ्या शेतकऱ्याला हे दृश्य दिसून आले. नंतर नातेवाईकाने बीड येथील शासकीय रुग्णालयामध्ये दाखल करण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला हॉस्पिटलला उपचारासाठी दाखल केल्यानंतर तपासणी आणती डॉक्टरांनी मयत म्हणून घोषित केले. या घटनेमुळे एका तरुणताठ्या शेतकऱ्याचा दुर्दैवी विजेच्या तारेला स्पर्श होऊन मृत्यू झाल्यामुळे चिंचोटी ग्रामस्थांमधून महावितरण विरोधात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. तर या मयत शेतकऱ्याचे वडील अगदी लहानपणीच छत्र हरवले आहे. तर हा मयत शेतकरी अविवाहित असून आई व एक भाऊ एवढाच परिवार असून गोंडे परिवार परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून या घटनेची सखोल चौकशी करून मयत कुटुंबीयांना महावितरणाने आर्थिक मदत घोषित करावी. अन्यथा महावितरण विरोधा खूनाचा गुन्हा दाखल करावा. अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे. काल सायं. सहा वाजण्याच्या सुमारास तरुण शेतकऱ्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# गोदावरी बचाव सर्वपक्षीय समितीने घेतली अंबादास दानवे यांची भेट

### गेवराई घरकुल वाळू घोटाळ्याची दिली संपूर्ण माहिती



**गेवराई । प्रतिनिधी**

आज 'गोदावरी बचाव सर्वपक्षीय समिती'च्या वतीने विरोधी पक्षनेते तथा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) मराठवाडा संपर्क प्रमुख अंबादास दानवे यांची भेट घेऊन त्यांना गेवराई तालुक्यातील घरकुल वाळू घोटाळ्याबाबत सविस्तर माहिती व निवेदन देण्यात आले.या भेटीदरम्यान तालुक्यातील गोरगरीब घरकुल धारकांना वाळू मिळण्यात येणाऱ्या अडचणी आणि त्यातील भ्रष्टाचारावर सविस्तर चर्चा झाली.गेवराई तालुक्यातील एकही पात्र घरकुल धारक वाळूपासून वंचित राहणार नाही.गरीब लाभार्थ्यांच्या हक्कासाठी शिवसेना पूर्ण ताकदीने प्रयत्न करणार.घरकुल वाळू घोटाळ्याप्रकरणी संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाईची मागणी करणार.या घोटाळ्यात संशयित असलेले गेवराईचे तहसीलदार खोमणे, उपविभागीय अधिकारी कविता जाधव आणि जिल्हा गौण खनिज अधिकारी नरेंद्र कुलकर्णी यांच्यावर तात्काळ चौकशी करून कडक कारवाई करण्याची मागणी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे प्रशासनाकडे लावून धरणार आहेत. गोरगरिबांच्या हक्काची वाळू चोरणाऱ्या भ्रष्टाचाऱ्यांना सोडणार नाही, असा इशारा यावेळी देण्यात आला.यावेळी गेवराई तालुक्यातील सर्व पक्षीय पदाधिकारी उपस्थित होते.

# अयोध्येतील दानचोरी विरोधात बीडमधे ठाकरेंची शिवसेना आक्रमक

### राममंदीर दानचोरांवर गुन्हे दाखल करा-जिल्हाप्रमुख गणेश वरेकर

**बीड । प्रतिनिधी**

**अयोध्या येथील समस्त हिंदुंचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीराम मंदिरामधे दानपेटी व दानामधे करोडो रूपयांचा घोटाळा झाल्याचे उघडकीस आले आहे.सदरील चोरी प्रकरणात मोठमोठी नावे सहभागी असुन मंदिर स्थापनेपासुन या दानपेटी व दानामधे घोटाळा सुरू असल्याचे अयोध्येतील साधुसंत सांगत आहेत.**



या सर्व चोरी प्रकरणात हिंदु धर्मीयांच्या आस्थेचा गैरफायदा घेऊन भाजपा सत्तेत आली व नंतर राममंदिरातील करोडो रूपयांचे दान हडप करून मंदिर समिती व अन्य चोर लोकांनी हिंदुंचा अवमान केला आहे. या सर्व गैरप्रकाराविरोधात समस्त रामभक्त व कारसेवकांच्या वतीने शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी हिंदुंना एकजुट होण्याचे आवाहन केले आहे तसेच सर्व हिंदुी एक होऊन जे दोषी आहेत त्यांना कठोरात कठोर शासन व्हावे असे मत व्यक्त करून मुंबई येथील हानुमान मंदिरात रामरक्षा म्हणाले. मा.पक्षप्रमुखांच्या आदेशानुसार बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने माजी विरोधीपक्षनेते तथा आमदार अंबादास दादा दानवे यांच्या मार्गदर्शनात व बीड जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांच्या नेतृत्वात व बीड तालुकाप्रमुख गोरखआण्णा शिंगण, बीड जिल्हा संघटक रतनतात्या गुजर, शिवसहकार सेना जिल्हाप्रमुख गणेश जाधव, यांच्या प्रमुख उपस्थितीत हानुमान मंदिर माळीवेस, बीड येथे रामरक्षा सह महाआरती व हानुमान चालीसाचे पठण करण्यात आले.यावेळी जय श्री राम, बजरंगबली की जय, प्रभु श्री रामाचा विजय असो अशा घोषणा देण्यात आल्या. या प्रसंगी उपतालुकाप्रमुख रामनारायण जाधव, तालुका सचिव नंदु येवले, तालुका सहसचिव संदिप भानप, विकास गवते, मुकेश घुमरे, तसेच शाखाप्रमुख ज्ञानेश्वर शिंगण, राजेंद्र भोसले व अंगद वाझे सह अशोक खांडे, गजु शिंदे, बाबु कुटे, अभिषेक कुटे, रोहीदास रांजवण, रामा जाधव, हरी इंगोले, गजानन जाधव, बाळासाहेब बेंगडे, दादासाहेब गवते, राजाभाऊ सानप, गणेश कदम, बारीकराव कुटे, बाबुराव प्रभाळे सह पदाधिकारी शिवसैनिक व रामभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते

# पान १ वरून...

## कर्जमाफीची रक्कम खात्यात जमा

लागण्याची शक्यता असते. या काळात बँका किंवा सहकारी संस्था थकीत कर्जावर व्याज आकारत राहिल्यास कर्जाची रक्कम वाढून शेतकऱ्यांवर अतिरिक्त आर्थिक ताण निर्माण होऊ शकतो. ही बाब लक्षात घेऊन शासनाने व्याज आकारणीस तात्पुरती स्थगिती देण्याचा निर्णय घेतला आहे. सहकार विभागाने जारी केलेल्या आदेशानुसार, कर्जमाफीचा लाभ प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात जमा होईपर्यंत संबंधित बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, राष्ट्रीयीकृत बँका तसेच विविध कार्यकारी सहकारी संस्थांनी थकीत पीककर्जावर कोणतेही अतिरिक्त व्याज लावू नये. या निर्देशांचे काटेकोर पालन करण्याची जबाबदारीही संबंधित वित्तीय संस्थांवर सोपविण्यात आली आहे.ङ्गशासनाच्या या निर्णयामुळे कर्जमाफी प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा आर्थिक अन्याय होणार नाही, तसेच पात्र शेतकऱ्यांना जाहीर केलेल्या कर्जमाफीचा पूर्ण लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. कृषी क्षेत्रातील वाढत्या आर्थिक अडचणींच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय शेतकऱ्यांसाठी दिलासादायक मानला जात आहे.

---------------

## राज्याच्या राजकारणात आठ

सचिन अहिर यांनीही ठाकरेंची साथ सोडली. एकनाथ शिंदे यांनी अहिर यांना विधानपरिषदेच्या उपसभापतिपदाची संधी दिल्याने त्यांनी हा मोठा निर्णय घेतला. गेल्या आठ दिवसांपासून संपूर्ण राज्यात 'ऑपरेशन टायगर ३' बाबत विविध तर्क-वितर्क लढवले जात आहेत. सत्ताधारी पक्षातील अनेक प्रमुख नेत्यांनी यावर सकारात्मक भाष्य केले असतानाच, आता एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आमदार नरेंद्र भोंडेकर यांनी या मोहिमेबाबत सर्वात मोठी आणि महत्त्वाची अपडेट दिली आहे. राजकारणात लोक येतात आणि जातात, तुम्ही काळजी करू नका, तुम्हाला सतत ब्रेकिंग न्यूज मिळत राहील आणि येत्या ८ दिवसांत 'ऑपरेशन टायगर ३' प्रत्यक्ष पाहायला मिळेल, असे भोंडेकर यांनी स्पष्ट केले आहे. त्यांच्या या विधानामुळे आगामी काळात शिंदे यांच्या शिवसेनेत मोठ्या प्रमाणावर इनकमिंग होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. दुसरीकडे, गेल्या काही दिवसांपासून आमदार फुटणार असल्याच्या या चर्चेवरून दोन्ही शिवसेनेत जोरदार आरोप-प्रत्यारोप आणि कलगीतुरा रंगला आहे. नुकतेच विधिमंडळाचे अधिवेशन सुरू असताना राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनीही 'ऑपरेशन टायगर ३' बाबत सूचक भाष्य केले होते. हे ऑपरेशन कधी आणि कसे होईल हे कोणाला कळणारही नाही, तसेच एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत लवकरच अनेक विद्यमान आमदार आणि माजी मंत्री प्रवेश करणार आहेत, असे मंत्री आबिटकर यांनी ठासून सांगितले होते. त्यानंतर शिवसेनेचे प्रवक्ते आणि मंत्री यांनी देखील यामध्ये भर घालत 'ऑपरेशन ३.०' सुरू झाले असून आता मोठा राजकीय भूकंप होणार असल्याचे म्हटले होते. हा भूकंप कधी घडवून आणायचा याचा अंतिम निर्णय स्वतः उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे घेणार आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले होते. शिवसेनेच्या सर्वच बड्या नेत्यांनी आगामी काळात मोठा पक्षप्रवेश होण्याचे संकेत दिल्यामुळे या मोहिमेची चर्चा आता गल्लीपासून दिल्लीपर्यंत रंगू लागली आहे. दरम्यान, एकीकडे 'ऑपरेशन टायगर ३' च्या माध्यमातून आमदार फोडण्याच्या हालचालींना वेग आला असतानाच, दुसरीकडे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे देखील पूर्णपणे ॲक्शन मोडवर आले आहेत. आपला गड वाचवण्यासाठी त्यांनी तातडीने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. मंगळवारी सायंकाळी उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या सर्व आमदारांची 'मातोश्री' या निवासस्थानी एक महत्त्वपूर्ण बैठक बोलावली आहे. या बैठकीत ते उपस्थित आमदारांना सद्यस्थितीवर मार्गदर्शन करणार असून, त्यांना सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचा कानमंत्र देणार असल्याचे समजते. आगामी काळातही विरोधी गोटाकडून आमदार फोडण्याचे प्रयत्न होऊ शकतात, ही शक्यता गृहीत धरून उद्धव ठाकरे आपल्या आमदारांना फुटीपासून रोखण्यासाठी नेमक्या काय सूचना देतात, याकडे आता संपूर्ण राजकीय विश्वाचे डोळे लागले आहेत.

------------

## पक्ष बदलण्यासाठी काँग्रेसच्या

आश्चर्य व्यक्त केले. महाराष्ट्रातील भाजपचे ज्येष्ठ नेते आणि राज्यमंत्री गिरीश महाजन यांनीही राऊत यांचा दावा फेटाळून लावला. राऊत नेहमीच काल्पनिक आकडेवारीबद्दल बोलत असतात, असे महाजन म्हणाले. त्याऐवजी ठाकरेसेनेने आपल्या पक्षाला बळकट करण्यावर लक्ष केंद्रित करावे, असा टोलाही त्यांनी राऊत यांना लगावला.

-------------

## विद्यार्थ्यांच्या सुरक्षित व सुलभ

सुरक्षित प्रवासाला सर्वोच्च प्राधान्य देत शालेय वेळेत बसस्थानकांवर पर्यवेक्षकीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येत असल्याचे सांगितले. हे कर्मचारी विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे बसमध्ये चढण्यास मदत करतात. तसेच, प्रवासादरम्यान कोणतीही अडचण उद्भवल्यास तातडीने मदत मिळावी यासाठी एसटी महामंडळाने स्वतंत्र टोल-फ्री मदत केंद्र सुरू केले असून त्यामुळे पालक आणि विद्यार्थ्यांचा एसटीवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे. प्रताप सरनाईक म्हणाले की, राज्यात दररोज सुमारे ३० हजार १७७ शालेय फेऱ्यांद्वारे लाखो विद्यार्थ्यांना सुरक्षित व नियमित प्रवासाची सुविधा उपलब्ध करून दिली जात आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणात आर्थिक अडथळा येऊ नये, यासाठी एसटी महामंडळ विविध सवलतींच्या योजना प्रभावीपणे राबवत आहे. पुढे बोलताना प्रताप सरनाईक म्हणाले की, अहिल्याबाई होळकर योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील इयत्ता पाचवी ते बारावीपर्यंतच्या मुलींना शंभर टक्के मोफत प्रवासाची सुविधा देण्यात आली आहे. शैक्षणिक सहलींसाठी ५० टक्के सवलत, मासिक विद्यार्थी पासवर ६६.६७ टक्के सवलत तसेच उन्हाळी सुट्टी, परीक्षा, शैक्षणिक शिबिरे किंवा आजारी पालकांना भेट देण्यासाठीच्या प्रवासासाठीही ५० टक्के सवलत देण्यात येते. प्रताप सरनाईक पुढे बोलताना म्हणाले की, आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये २५.१३ लाख अहिल्याबाई होळकर पास आणि २७.९८ लाख विद्यार्थी मासिक पास वितरित करण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांसाठी एनसीएमसी () स्मार्ट कार्ड देण्याची प्रक्रियाही सुरू असून त्यामुळे त्यांचा प्रवास अधिक सुलभ, आधुनिक आणि पारदर्शक होणार आहे. कौशल्य सेतू अभियानांतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवासभाड्यात ६६.६७ टक्के सवलत दिली जात आहे. तसेच मानव विकास योजनेअंतर्गत राज्यातील २२ जिल्ह्यांमध्ये ९६६ बसेसद्वारे ७३ हजार ६२१ मुलींना मोफत वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. शेवटी बोलताना प्रताप सरनाईक म्हणाले की, ''एसटीची 'लालपरी' ही आज केवळ रस्त्यावर धावणारी बस नसून प्रत्येक विद्यार्थ्याच्या स्वप्नांची सारथी, प्रत्येक पालकाच्या विश्वासाची हमी आणि महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी अविरत धावणारी ज्ञानवाहिनी आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या आयुष्यात शिक्षणाचा दीप अखंड तेवत ठेवण्यासाठी एसटी महामंडळ अधिक सक्षमपणे, संवेदनशीलतेने आणि समर्पित भावनेने कार्य करत राहील,'' असा विश्वास व्यक्त केला.

----------

## बीड झेडपीत अधिकाऱ्याविरुद्ध

परिषद आणि पोलीस अधीक्षक बीड यांना पत्र लिहून ही तक्रार पूर्णपणे खोटी आणि बनावट असल्याचे म्हटले आहे. ''मी अशा प्रकारची कोणतीही तक्रार दिलेली नाही. माझे नाव वापरून ही बनावट तक्रार जिल्हा परिषद कार्यालयातूनच तयार करण्यात आली असून, उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी हे षडयंत्र रचल्याचा संशय आहे,'' असा खळबळजनक आरोप खाडे यांनी केला आहे. आपली बदनामी करण्यासाठी हे कृत्य केल्याचे सांगत त्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. आता तक्रारदारानेच केलेल्या या गंभीर आरोपांनंतर जिल्हा प्रशासन यावर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. प्रामुख्याने या खोट्या तक्रारीमध्ये काही मुद्दे आढळून आले त्यावरूनच नूतन सीईओ रहमान यांनी चौकशी समिती नेमली. या चौकशी समितीमध्ये अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह बिडिओ आणि एका कक्ष अधिकाऱ्याचा समावेश आहे. एका आयएएस अधिकाऱ्याची चौकशी करण्यासाठी वरिष्ठ आयएएस अधिकारीच नेमला पाहिजे. येथे मात्र आएएएस अधिकाऱ्यांची चौकशी कनिष्ठ कर्मचारी करणार असल्याने बीड जिल्हा परिषदेमध्ये नेमके चालले काय.? असा प्रश्न निर्माण होत आहे.

-----------------

## राज्य महामार्गांवर आधुनिक जनसुविधा

जारी केल्या आहेत. विशेषतः महिला प्रवाशांसाठी स्वच्छ व सुरक्षित प्रसाधनगृहांची कमतरता लक्षात घेऊन ही योजना प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. राज्य महामार्गांवर मोठ्या प्रमाणावर वाहतूक होत असली, तरी सार्वजनिक प्रसाधनगृहांची संख्या त्या मानाने कमी आहे. यापूर्वी हॉटेल, ढाबे, पेट्रोल पंप, तसेच सार्वजनिक सहभागातून काही सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. मात्र, त्या पुरेशा नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यालगत नियोजनबद्ध पद्धतीने जनसुविधा केंद्रे उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य शासनाच्या सूचनेनुसार प्रत्येक विभागीय कार्यालयाने प्रथम राज्य महामार्ग व प्रमुख जिल्हा मार्गांवरील योग्य जागांची निवड करावी. त्यानंतर इच्छुक खासगी संस्था, उद्योग, स्वयंसेवी संस्था किंवा व्यक्तींकडून प्रस्ताव मागविण्यात येणार आहेत. जाहिरात फलक व उपाहारगृहातून उत्पन्न मिळू शकणार्या ठिकाणी सर्वाधिक महसूल देणार्या संस्थेला नियमानुसार काम देण्यात येईल. महानगरांलगतच्या परिसरात अशा प्रकल्पांना चांगला प्रतिसाद मिळत असला, तरी ग्रामीण व दुर्गम मार्गांवर खासगी संस्था पुढे येत नसल्याचे शासनाच्या अभ्यासातून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे अशा महत्त्वाच्या आणि वर्दळीच्या किमान दोन ठिकाणी शासन आर्थिक सहभागातून प्लिथंपर्यंतचे बांधकाम तसेच वीज व पाणी जोडणी उपलब्ध करून देणार आहे. त्यानंतर उर्वरित बांधकाम, अंतर्गत सुविधा, देखभाल, सुरक्षा आणि दैनंदिन संचालनाची जबाबदारी संबंधित खासगी संस्था किंवा व्यक्तीवर राहणार आहे. या केंद्रांच्या देखभाल, स्वच्छता व सुरक्षेसाठी आवश्यक मनुष्यबळाची नियुक्ती संबंधित संस्थेलाच स्वतःच्या खर्चाने करावी लागणार आहे. ही अट करारनाम्यात स्पष्टपणे नमूद केली जाणार आहे. तसेच, प्रत्येक विभागाने जनसुविधा केंद्रांच्या प्रगतीचा मासिक अहवाल शासनाकडे सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

--------------

## राम मंदिरातील दान चोरी झांकी असेल तर

भीती वाटायला लागलीय की, ही अयोध्येची झांकी असेल तर काशी, मथुरा किती लुटतील, असा प्रश्न उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला.

अयोध्येथील श्रीराम मंदिरातील दान चोरीच्या विरोधात उद्धव ठाकरेंची शिवसेना आक्रमक झाली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून रामरक्षा आंदोलन सुरू करण्यात आले आहे. दादरच्या ऐतिहासिक हनुमान मंदिरात महाआरती तसेच रामरक्षा स्त्रोत आणि हनुमान चालीसा, मारुती स्त्रोत पठणाने राज्यव्यापी आंदोलनाची सुरुवात झाली. यावेळी उद्धव ठाकरे यांनी यावेळी भाषण करताना जमलेल्या तमाम हिंदू बांधवांनो, भगिनींनो आणि मातांनो अशी सुरुवात केली. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंनी देशातील तमाम हिंदूंना जागे केले होते, विखुरलेल्यांना एक केले होते, आजही तो क्षण आपल्या डोळ्यासमोर आहे. आपण कट्टर कडवट देशाभिमानी हिंदू आहोत. आम्ही हिंदू भोळे आहोत, भाबडे आहोत पण मूर्ख नाही आहोत. आपल्या हिंदुत्वाचा गैरफायदा घेऊन जर कोणी मंदिर लुटत असेल तर मी परवाच बोललोय अब हिंदू माफ नही करेगा. या देशाची सत्ता घेताना जय श्रीरामच्या घोषणा दिल्या गेल्या, मंदिर वही बनायेंगे पण तेव्हा शिवसैनिकांनी जेवढे काम केले मला नाही वाटत तेवढं दुसऱ्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी केले असेल. शिला पूजन, रथयात्रा, अयोध्येत जाऊन कार सेवा केली होती, असे उद्धव ठाकरे यांनी सांगितल. मुंबई शहराने जे भोगले ते क्वचित एखाद्या शहराने भोगले असेल. बॉम्बस्फोट झाले, दंगली झाल्या, तेव्हा देशातील एकच मर्द शिवेसनाप्रमुख हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे हिंदूंच्या पाठीशी उभा राहिला होता. हिंदू भयग्रस्त होता, हिंदू आक्रमित होता, तेव्हा आधार शोधत होता, त्यावेळेला शिवसेनेचा भगवा शिवसेनाप्रमुखांनी शिवसैनिकांच्या हातात दिला. गैरफायदा घेतला गेला, नको ती लोकं सत्ता भोगत आहेत, हिंदू आजही भरडला जातोय, असे उद्धव ठाकरे म्हणाले. बारा वर्षात आपल्या भगव्याचे सरकार तिकडे आले असताना आपल्याला वाटत होते, अब हिंदू मार नही खायेगा, मात्र हिंदूंना लुटणारे सरकार तिथे बसलेय हे आपले दुर्भाग्य आहे. पहिली सुरुवात शंकराचार्यांनी केली, केदारनाथातील सोने लुटले गेले. मध्यप्रदेशातील मुख्यमंत्र्यांवर उज्जैनमधील जमीन लुटली गेल्याचे आरोप झाले. बद्रीनाथमध्ये पण चोरीच्या बातम्या येत आहेत. अयोध्येत एक आयएएस ऑफिसर बोलतात, आईचे सोन्याचे दागिने वितळवले आणि एक किलोचा सोन्याचा मुलामा असलेले रामचरितमानस गायब झाले, नऊ नऊ तास बसवले जाते पण उत्तर दिले जात नाही. शिवसेनेने फुल ना फुलाची पाकळी म्हणून काही पैसे दिले, चांदीच्या विटा दिल्या, कुठे गेले हे सगळे, असा सवाल उद्धव ठाकरेंनी केला.

-----------

## प्रशांत किशोर लढविणार पोटनिवडणूक,

यांनीच पत्रकार परिषदेत दिली. बांकीपूरमधील पोटनिवडणूक राज्य सरकारच्या लोकप्रियतेची चाचपणी करणारे सार्वमत ठरेल. पोटनिवडणुकीत भाजपचा विजय झाल्यास राज्य सरकारला जनतेचा पाठिंबा असल्याचे मी मान्य करेन. मात्र, आमचा विजय झाल्यास सत्ताधाऱ्यांनी जनतेचा संदेश काय ते समजून घ्यावे. बांकीपूरमधील मतदारांकडे बिहारमधील सर्वांत शिक्षित जनता म्हणून पाहिले जाते. त्यांनी चांगल्या हेतूने मतदान करावे. माझ्यावर विश्वास असेल; तर मला मतदान करावे. माझ्या पक्षाचा मी एकमेव आमदार ठरलो तरी विधानसभेतील इतर २४२ आमदारांपेक्षा सरस ठरेन, अशी भूमिका किशोर यांनी मांडली. भाजपचे नेते सम्राट चौधरी जनादेशाविना बिहारचे मुख्यमंत्री बनले. राज्यात मागील वर्षी विधानसभा निवडणूक झाली. त्या निवडणुकीत एनडीएने जेडीयूचे अध्यक्ष नितीश कुमार यांना चेहरा बनवले होते, याकडे त्यांनी लक्ष वेधले. बांकीपूर मतदारसंघ भाजपचा बालेकिल्ला मानला जातो. आता तिथून पोटनिवडणुकीच्या रिंगणात उडी घेऊन किशोर यांनी भाजपला थेट आव्हान दिले आहे. किशोर यांच्या पक्षाने अतिशय ताकदीने मागील वर्षीची विधानसभा निवडणूक लढवली. मात्र, तो पक्ष एकही जागा जिंकू शकला नाही. त्या पीछेहाटीचा शिक्का पुसण्यासाठी स्वत: किशोर मैदानात उतरणार आहेत. मागील वर्षीची निवडणूक त्यांनी उमेदवार म्हणून लढवली नव्हती.

-------------

## अर्ध्या राज्याला पावसाने

जिल्ह्यात सर्वाधिक पाऊस हा माथेरानमध्ये ४०८ मिमी पाऊस पडला आहे. मुसळधार पावसाने रायगड जिल्ह्यात धुमाकूळ घातला असून अनेक भागात पूरस्थिती निर्माण झाली आहे. पावसामुळे मुंबई - गोवा महामार्गावर पाणीच पाणी साचले असल्याने काहीकाळ वाहतूक ठप्प झाली होती. विदर्भातही पावसाचा जोर कायम असून, बुलढाण्याच्या चिखली तालुक्यात ढगफुटी सदृश पावसाने भीषण पूरस्थिती निर्माण झाली असून अनेक गावाचा तालुक्याशी संपर्क तुटला. दुसरीकडे गोसीखुर्द धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये झालेल्या मुसळधार पावसामुळे आणि सोबतच गोंदिया जिल्ह्यातील धापेवाडा आणि पुजारीटोला धरणातून होत असलेल्या पाण्याच्या विसर्गामुळे भंडारा जिल्ह्यातील गोसेखुर्दचे सर्व ३३ दरवाजे अर्धा मीटरने उघडण्यात आले. राज्यात मोसमी पावसाचा जोर वाढलेला असताना मराठवाड्यात अद्यापही जोरदार पावसाची प्रतीक्षा आहे. दोन दिवसांपासून मध्यम ते हलक्या सरी कोसळत आहेत. जुलैच्या पहिल्या आठवड्यातही जेमतेम पाऊस झाला आहे.

------------

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार, दि. ०६ जुलै २०२६


थोडक्यात



## श्री हॉस्पिटल या ठिकाणी रक्तदान व महाआरोग्य तपासणी शिबिर उत्साहात संपन्न

दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील चंद्रभागा मल्टीस्टेट चे अध्यक्ष अतुल ठोंबरे यांच्या वाढदिवसानिमित्त गुरुवारी रक्तदान व महारोग्य तपासणी शिबिराचे आयोजन श्री हॉस्पिटलमध्ये करण्यात आले. या शिबिरात ७३ रक्तदात्यांनी रक्तदान तर १५५ गरजवंत रुग्णांनी आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. दिंद्रुड पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश भोसले साहेब यांच्या अध्यक्षतेखाली हा उपक्रम पार पडला. यावेळी अस्थिरोग तज्ञ डॉ.अमोल लगड, भौतिकोपचार तज्ञ डॉ.संतोष गायकवाड, दंतरोग तज्ञ डॉ.कृष्णा फड, माजी पंचायत समिती सदस्य कैलास ठोंबरे तसेच अतुल ठोंबरे, डॉ.विष्णु तांबडे व डॉ.दत्तात्रय भुजबळ यांची प्रमुख उपस्थिती होती. वाढदिवसानिमित्त अवांतर खर्च करण्यापेक्षा सामाजिक उपक्रम राबवून समाज उपयोगी कार्य केल्याबद्दल सपोनि महेश भोसले यांनी आयोजकांचे विशेष कौतुक केले. या शिबिरामध्ये ७३ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली, तर १५५ गरजवंत रुग्णांनी आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ घेतला. या उपक्रमाचे आयोजन डॉ. शुभम तिडके, कैलास साळुंखे आणि अशोक लगड यांनी केले होते.

## विलास खरात यांच्या वाढदिवसानिमित्त आपला परिवार वृद्धाश्रमात किराणाचे वाटप

वडवणी । प्रतिनिधी

वाढदिवस म्हणजे केवळ आनंदोत्सव किंवा खर्चाचा दिवस नसून समाजाप्रती आपली बांधिलकी जपण्याची संधी आहे हा संदेश देत पोलीस जमादार विलास खरात यांनी आपला वाढदिवस अनोख्या पद्धतीने साजरा केला. श्रीक्षेत्र चाकरवाडीजवळील कळसंबर येथील आपला परिवार वृद्धाश्रमात वृद्धांना किराणा साहित्य व फळांचे वाटप करून त्यांनी वाढदिवस समाजसेवेला अर्पण केला.





यावेळी वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांसोबत वाढदिवस साजरा करण्यात आला. वृद्धांना आवश्यक किराणा साहित्य व फळांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे वृद्धांच्या चेहऱ्यावर समाधानाचे आणि आनंदाचे हास्य उमटले. उपस्थितांनी या सामाजिक उपक्रमाचे कौतुक करत विलास खरात यांच्या संवेदनशीलतेचे अभिनंदन केले. कार्यक्रमात आपला परिवार वृद्धाश्रमाचे संचालक सुनील पवार यांनी विलास खरात यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. तसेच सौ. शोभा सुनील पवार यांनी औक्षण करून त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलताना पोलीस जमादार विलास खरात म्हणाले की,वाढदिवसानिमित्त होणारा अनावश्यक खर्च टाळून तो समाजोपयोगी कार्यासाठी खर्च करण्याचा निर्णय घेतला. गरजू वृद्धांच्या चेहऱ्यावर आनंद पाहायला मिळाला हीच माझ्यासाठी वाढदिवसाची खरी भेट आहे.आजचा दिवस अशा सेवाकार्यात घालवता आल्याने माझा वाढदिवस खऱ्या अर्थाने सार्थकी लागला. कळसंबर येथे सामाजिक कार्यकर्त्या मनीषा पवार यांनी अनेक वर्षांपासून गोरगरीब, निराधार आणि वयोवृद्धांसाठी आपला परिवार वृद्धाश्रम सुरू केला असून या आश्रमात अनेक ज्येष्ठ नागरिकांना आधार मिळत आहे. अशा सेवाभावी संस्थेला मदतीचा हात देत विलास खरात यांनी सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण समाजासमोर ठेवले. यावेळी धुनकवाडचे सरपंच भागवत गव्हाणे, पत्रकार अविनाश मुजमुले, जगदीश गोरे, ज्ञानेश्वर यादव, नेकनूर येथील हाबाडा कॉम्प्युटर सेंटरचे संचालक सलीम पाशा शेख, नुमान मनियार यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रम राबवून पोलीस जमादार विलास खरात यांनी सामाजिक जबाबदारीची जाणीव जपत समाजासमोर एक प्रेरणादायी आदर्श निर्माण केला.

# जिल्ह्यात स्टॉप डायरिया अभियान २०२६ ग्रामस्थांनी सहभागी व्हा - जितिन रहमान

बीड । प्रतिनिधी

पावसाळ्यात दूषित पाणी, अस्वच्छता आणि वैयक्तिक स्वच्छतेच्या अभावामुळे अतिसारजन्य आजारांचा धोका वाढण्याची शक्यता लक्षात घेउन पाणीपुरवठा व आरोग्य विभाग यांच्या वतीने 'स्टॉप डायरिया अभियान २०२६' राबविण्यात येत आहे. हे अभियान १६ जून ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत संपूर्ण जिल्ह्यात सर्व ग्रामपंचायतीं व प्राथमिक आरोग्य केंद्र यांनी सक्रिय सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान यांनी केले आहे. अतिसार हा विशेषतः पाच वर्षांखालील बालकांसाठी जीवघेणा ठरू शकणारा आजार असून, सुरक्षित पिण्याचे पाणी, साबणाने हात धुण्याची सवय, परिसर स्वच्छता आणि योग्य स्वच्छताविषयक पद्धतींचा अवलंब केल्यास या आजारावर प्रभावी नियंत्रण मिळविता येते, असेही त्यांनी स्पष्ट केले, नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करून प्रतिबंधात्मक उपाय अधिक बळकट करणे हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे. शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आरोग्य विभाग, ग्रामपंचायत, स्वच्छता विभाग,शिक्षण, महिला व बालविकास तसेच ग्रामीण पाणीपुरवठा विभाग व ग्रामपंचायत समिती यांच्या समन्वयातून हे अभियान राबविले जाणार आहे.



> सुरक्षित पाणी, स्वच्छता आणि चांगल्या सवयींच्या माध्यमातून अतिसारमुक्त व निरोगी बीड घडविण्यासाठी १३६० गावातील प्रत्येक ग्रामस्थांनी या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवावा. तसेच ६० प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य कर्मचाऱ्यांनी समन्वय करावा . तर पाच उपविभागीय प्रयोगशाळेतील तंत्रज्ञांनी पाणी तपासणी साठी नियोजन करावे. प्रतिबंध हाच सर्वोत्तम उपाय असून सर्व विभागाचे कर्मचारी यांचे नियोजन व ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे हे अभियान अधिक प्रभावी ठरेल -
> मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड

अभियानांतर्गत तालुका ग्रामस्तरावर बैठका घेण्यात येणार असून, ग्रामपंचायती, पाणीपुरवठा व स्वच्छता समित्या, शाळा आणि अंगणवाडी केंद्रांपर्यंत जनजागृती केली जाणार आहे. गावनिहाय पाणी गुणवत्तेची तपासणी करून सर्व स्रोतांची नियमित चाचणी केली जाईल. विद्यार्थी व स्वयंसेवकांना फिल्ड टेस्ट किटच्या माध्यमातून पाणी तपासणीचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. ग्रामीण पाणीपुरवठा यंत्रणेतील गळती दुरुस्ती, पाणी साठवण टाक्यांची स्वच्छता व निर्जंतुकीकरण तसेच पिण्याच्या पाण्याचे नियमित क्लोरीनीकरण करून नळाद्वारे पुरवठा होणाऱ्या पाण्यात शेवटच्या नळाला किमान ०.२ पीपीएम क्लोरीन सापडला पाहिजे.

त्याप्रमाणे निर्जंदकीकरण राखण्यावर भर दिला जाणार आहे. या अभियानादरम्यान हात धुण्याचे महत्त्व, सुरक्षित पाणी वापर, अन्न स्वच्छतेचे नियम आणि अतिसार प्रतिबंध याबाबत व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात येणार आहे. स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत हागणदारीमुक्त स्थितीची शाश्वतता राखण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत. स्थानिक समुदाय, स्वयंसेवी संस्था, ग्रामपंचायत सदस्य आणि विविध विभागांच्या समन्वयातून हे अभियानावर भर दिला जाणार असून, पाणी गुणवत्तेशी संबंधित तक्रारीचा नियमित आढावा घेऊन नागरिकांन सुरक्षित पाणी उपलब्ध करून देण्या करिता तत्काळ कार्यवाही केली जाणार आहे. यासाठी सर्व संबंधित अधिकारी, आरोग्य विभागाचे कर्मचारी, ग्रामपंचायत स्तरावरी शाळा अंगणवाडी तसेच ग्राम पाणी पुरवठा स्वच्छता समितीचे सर्व सदस्य यांनी पुढाकार घेऊन निर्जंतूक केलेले पाणी सर्व कुटुंबांना मिळेल यासंबंधी जनजागृती करावी असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे.

## पतसंस्थेच्या विकासात गोवर्धन केरुळकर यांचे योगदान मोलाचे -चेअरमन बाबुराव अनारसे

आष्टी । प्रतिनिधी

गोवर्धन केरुळकर यांनी गेली २५ वर्षे बँकिंग क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केले असून त्यांना या क्षेत्राचा प्रदीर्घ अनुभव आहे. पंडित दीनदयाळ उपाध्याय पतसंस्थेच्या वाटचालीत आणि विकासात त्यांचे योगदान मोठे आहे. आता त्यांना नवीन ठिकाणी मोठी जबाबदारी मिळाली असून,तिथेही ते आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवतील असे गौरवोद्गार पतसंस्थेचे चेअरमन तथा प्रसिद्ध विधिज्ञ बाबुराव अनारसे यांनी काढले.

आष्टी येथील पंडित दीनदयाळ उपाध्याय पतसंस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोवर्धन केरुळकर यांना जालना जिल्ह्यातील एका मोठ्या मल्टीस्टेट बँकेत उच्च पदावर काम करण्याची संधी मिळाली आहे. त्यानिमित्त पतसंस्थेच्या वतीने त्यांच्यासाठी निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी ते बोलत होते.



चेअरमन बाबुराव अनारसे यांनी संस्थेच्या प्रवासावर प्रकाश टाकताना सांगितले की,सन १९९६ मध्ये स्थापन झालेल्या या पतसंस्थेने आष्टी परिसरात मोठा नावलौकिक मिळवला आहे. हजारो गरजूंना, सर्वसामान्य व्यावसायिकांपासून ते मोठ्या उद्योजकांपर्यंत सर्वांना वित्तपुरवठा करून संस्थेने मोलाचा आधार दिला आहे. केवळ व्यावसायिकच नव्हे,तर सामाजिक क्षेत्रातही संस्थेचे मोठे योगदान आहे. आष्टी नगर पंचायतीने जेव्हा जेव्हा नदी रुंदीकरण, खोलीकरण आणि वृक्षारोपणाचे आवाहन केले, तेव्हा संस्थेने नेहमीच सढळ हस्ते मदत केली आहे.

सामाजिक बांधिलकीचा भाग म्हणून,आष्टी पोलीस प्रशासनाने केलेल्या विनंतीचा आदर करत पतसंस्थेच्या वतीने पोलीस खात्याला आकर्षक व मजबूत बॅरिकेड्स बनवून देण्यात आले. केरुळकर यांच्या कार्याचे कौतुक केले.पुढे बोलताना ते म्हणाले की, पंडित दीनदयाळ उपाध्याय या थोर पुरुषाच्या नावाने सुरू झालेली ही संस्था राष्ट्रवादी विचारसरणी घेऊन विविध सामाजिक उपक्रम राबवत असते. संस्थेची स्वतःची भव्य इमारत असून, तरुणांना आरोग्याची गोडी लागावी म्हणून येथे 'श्रीराम हेल्थ क्लब' (जिम) चालवला जातो.या जिम हॉलला आष्टी तालुक्यातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते कै. श्री गुरुलिंग स्वामी यांचे नाव देऊन त्यांच्या स्मृतींना सन्मानित करण्यात आले आहे.

पतसंस्थेचे उपाध्यक्ष सुनील मेहर म्हणाले की,गोवर्धन केरूळकर ग्रामीण भागातून शिक्षण घेऊन पुढे आलेला युवक आहे. त्यांनी २५ वर्षापासून आमच्या पतसंस्थेमध्ये ग्राहकांना चांगली सेवा दिली आहे. पारदर्शक प्रशासन संभाळले आहे. पतसंस्थेमार्फत सामाजिक उपक्रम राबवताना यांनी चांगले परिश्रम घेतले होते अशा भावना व्यक्त केल्या.या भावपूर्ण निरोप समारंभाला पतसंस्थेचे सर्व संचालक सर्वश्री राजेंद्र जोशी, विजय शेकडे, श्रीकृष्ण देशपांडे, संग्राम गळगटे, मुकुंदकाका गरगडे, बी.वाय.निकाळजे, डॉ.पिसाळ यांच्या सह पतसंस्थेचे सर्व कर्मचारी आणि आष्टी शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हा परिषद ते नगरपालिका रस्त्याची शहर बचाव मंचने केली पाहणी

बीड । प्रतिनिधी

अनेक वर्षापासून जिल्हा परिषद ते नगरपरिषद रस्त्यालगतच्या नाल्या व रस्ता हेतूपुरस्सर पणे दुर्लक्षित ठेवण्यात आलेला होता. हा रस्ता मुद्दामच का दुर्लक्षित ठेवण्यात आला त्यालाही अनेक कारणे आहेत. गेल्या दोन वर्षापासून सतत बीड शहर बचाव मंचाच्या शिष्टमंडळाने नगरपालिकेमध्ये आजवर घेतलेल्या सर्वच बैठकांमधून निवेदने देऊन सातत्याने या रस्त्या साठी पाठपुरावा केलेला आहे. वारंवार या रस्त्याच्या दुरुस्तीची व रस्ता करण्याची मागणी लावून धरलेली आहे. नुकतेच बदलून गेलेले मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी मी हा रस्ता प्राध्यान्यक्रमाने मार्गी लावेल असे वारंवार आश्वासित केले होते. तरी या रस्त्याची व्यथा राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे दिवंगत पालकमंत्री अजित दादा पवार यांच्यासमोरही मांडण्यात आली होती. बीड शहर बचाव मंचाने सातत्याने केलेल्या पाठपुराव्यानंतर व मुख्याधिकारी शैलेश खडसे यांनी केलेल्या सर्व



कार्यवाहीनंतर या रस्त्यासाठी शासनाकडून निधी मिळवण्यात आला. बीड शहराला कोणतीही गोष्ट सहजासहजी मिळत नाही. शहराला एखादी गोष्ट मिळाली तरी ती शहरातील नागरिकांच्या व सामाजिक कार्यकर्त्यांच्या अथक प्रयत्नांनी व मोठ्या संघर्षाने मिळत असते. दिनांक ४ जुलै २०२६ शनिवार रोजी सकाळी १० वाजता बीड शहर बचाव मंचच्या वतीने बचाव मंचच्या टीम मधील काही सदस्यांनी व पत्रकारांनी जिल्हा परिषद ते नगरपालिका रस्त्याचे काम सुरू असताना जिल्हा परिषद समोरील सुरू असलेल्या रस्त्याची पाहणी करून सिताई कन्स्ट्रक्शनचे प्रतिनिधी किरण शिंदे यांच्याशी कामाच्या दर्जाबाबत सविस्तर चर्चा केली असता, शासनाने रस्त्याच्या कामाबाबत दिलेल्या निर्देशानुसार निश्चितच या रस्त्याचे गुणवत्ता पूर्ण दर्जेदार काम करण्यात येईल अशी ग्वाही यावेळी सिताई कन्स्ट्रक्शनचे प्रतिनिधी किरण शिंदे यांनी दिली. यावेळी बचाव मंचचे अध्यक्ष नितीन जायभाये,ड.अनिल बारगजे, डॉ. संजय तांदळे, ड. नितीन वाघमारे, रिपाई सेना जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम गोटू वीर, अनिल कचरे, सिताई कास्ट्रक्शनचे प्रतिनिधी किरण शिंदे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड यांचे न्यायालय**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६

जा.क्र.२०२६/सेतु/कावि-४७३ दिनांक-०४/०५/२०२६

अर्जदार श्रीमान/श्रीमती शांताराम शिवराम कुऱ्हाडे रा.अंबड ता.अंबड जि.जालना यांनी यांच्या मुला च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र. नाव अर्जदाराशी नाते जन्म दिनांक

साहिल विलास शिंदे भाचा १८/१०/२०१६

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक-//२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरित/-
तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी, अंबड

## पान ६ वरुन...

### पिठ्ठी येथे वैराग्यमूर्ती

महादेव धांडे, तेलप सर, रवी खाडे सर, पिठ्ठीचे माजी सरपंच नारायण भोंडवे, विद्यमान सरपंच प्रभाकर कवठेकर, बाळू ढोरे, तुकाराम कुडके, प्रा. गणेश कुडके यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, ग्रामस्थ व पंचक्रोशीतील हजारो भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संपूर्ण परिसर हरिनामाच्या गजराने, टाळ-मृदंगाच्या निनादाने आणि भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला. कार्यक्रमाचे नियोजन पंचक्रोशीतील भाविक व ग्रामस्थांनी उत्कृष्टरीत्या केले. सोहळ्यानंतर सर्व उपस्थितांना महाप्रसादाचा लाभ देण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी वैराग्यमूर्ती सद्गुरू माणिक बाबा गिरी महाराज यांच्या हरिनाम, गोसेवा, मानवसेवा आणि समाजप्रबोधनाच्या कार्याचा गौरव करत, त्यांचा आध्यात्मिक वारसा पुढील पिढीपर्यंत जतन करण्याचा संकल्प व्यक्त केला.

### बीडच्या इतिहासात प्रथमच

वाहतूक समिती कार्यरत असून चालक, अटेंडंट व पालकांच्या नियमित बैठका घेऊन सुरक्षित वाहतुकीबाबत सातत्याने जनजागृती केली जात असल्याची माहिती दिली. अशा कार्यशाळा प्रत्येक शाळेत आयोजित होणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

पालक प्रतिनिधी आघाव यांनी पालकांनी अल्पवयीन मुलांच्या हातात वाहने देऊ नयेत, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत सतर्क राहावे आणि शाळा व वाहतूक व्यवस्थापनाला सहकार्य करावे, असे आवाहन केले. जीनियस ऑटो रिक्षा संघटनेचे अध्यक्ष बाबू आत्तार यांनी संघटनेतील सर्व रिक्षाचालकांना वेळोवेळी सुरक्षा सूचना दिल्या जात असून जिल्हा वाहतूक शाखेच्या नियमांचे काटेकोर पालन केले जाईल, अशी ग्वाही दिली. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. शंकर धांडे यांनी व्यसन करून वाहन चालविणे हा गंभीर गुन्हा असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांना शाळेतून सुरक्षितपणे पालकांच्या स्वाधीन करेपर्यंत चालक व अटेंडंट हेच त्यांचे पालक असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची नैतिक आणि कायदेशीर जबाबदारी त्यांनी अत्यंत संवेदनशीलतेने पार पाडावी, असे त्यांनी प्रतिपादन केले. कार्यक्रमाच्या शेवटी रोटरी सेंटर फॉर रोड सेफ्टी अँड ट्रॅफिक अवेअरनेसचे संचालक प्रो. डॉ. प्रकाश कोंका यांनी उपस्थित मान्यवर, अधिकारी, मुख्याध्यापक, पालक, चालक, अटेंडंट, जीनियस ऑटो रिक्षा संघटनेचे पदाधिकारी, रोटरी सदस्य आणि सर्व सहभागींचे आभार मानले. बीडच्या इतिहासात प्रथमच आयोजित करण्यात आलेली ही शालेय वाहतूक सुरक्षितता कार्यशाळा विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी शाळा, पालक, वाहतूक व्यावसायिक आणि प्रशासन यांना एकाच व्यासपीठावर आणणारी ठरली. रस्ता सुरक्षा जनजागृतीच्या दिशेने हा उपक्रम एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

### संपादक कडबाने यांच्यावरील

होते. प्रशासनासमोर सत्य मांडल्याचा राग मनात धरून, समीर काझी यांनी स्वतःच्या प्रभावाचा वापर करत संपादक बाळासाहेब कडभाणे यांच्यावर खोटा गुन्हा दाखल केल्याचा आरोप पत्रकार संघाने केला आहे. ही कारवाई म्हणजे लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाची मुस्कटदाबी करणारी असल्याचे सिरसाळा पत्रकार संघाचे म्हणणे आहे. पत्रकारांनी सत्य मांडल्यास त्यांच्यावर अशा प्रकारे खोटे गुन्हे दाखल करणे चुकीचे असून, पत्रकार संघ या प्रकाराचा जाहीर निषेध करत आहे. हे खोटे गुन्हे मागे घेण्यात यावेत, अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. या निवेदनावर मिलिंद चोपडे , अशोक गव्हाणे , जावेद पठाण , बाबासाहेब गरड , शफिक पठाण , रमेश लहाने आणि अतुल बोबडे यांसह सिरसाळा येथील अनेक पत्रकारांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### सरपंच मयुर आंधळे यांच्या

शंकर अण्णा आंधळे व अँड. मयूर आंधळे यांच्या वतीने शाल, श्रीफळ, हार देऊन हृदयपूर्वक सत्कार करण्यात आला. यावेळी मयूर आंधळे यांनी हाती घेतलेल्या रुई गावच्या विकासाबाबत त्यांना विश्वास पाटील यांनी शुभेच्छा देखील दिली आहेत. रुई गाव राज्याच्या पटलावर नव्हे तर देशाच्या पटलावर आदर्श गाव म्हणून ओळखले जावे अशी इच्छा देखील व्यक्त केली. याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते व उद्योजक रामराव काका शिंदे साहेब यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी वडवणी पंचायत समिती चे माजी सभापती मा. श्री. संदीपान आप्पा खळगे पाटील, युवा नेते मा. श्री. महादेव जी सावंत पाटील, ग्रामपंचायत सदस्य मा. श्री. कृष्णा खाडे, मा. श्री. गोरख जी आंधळे, मा. श्री. रघुबप्पा आंधळे, मा. श्री. निलेश आंधळे, मा. श्री. गोपालमामा डोंगरे, मा. श्री. हरिभाऊ जावळे, मा. श्री. कृष्णा भैया आंधळे, मा. श्री. दादासाहेब खाडे, मा. श्री. धनराज धाईतिडक, मा. श्री. सुभाषदादा आंधळे, मा. श्री. विविशन आंधळे उपस्थित होते.

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड यांचे न्यायालय**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६

जा.क्र.२०२६/सेतु/कावि-१४१२ दिनांक-२८/११/२०२५

अर्जदार श्रीमान/श्रीमती शिवाजी उत्तम शिंदे रा.शहापुर ता.अंबड जि.जालना यांनी यांच्या स्वतः च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र. नाव अर्जदाराशी नाते जन्म दिनांक

शिवाजी उत्तम शिंदे स्वतः ०१/०१/१९९४

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक-२८/११/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरित/-
तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी, अंबड

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड यांचे न्यायालय**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६

जा.क्र.२०२६/सेतु/कावि-६९३ दिनांक-२९/०६/२०२६

अर्जदार श्रीमान/श्रीमती आनंद लक्ष्मण खरात रा.वडीकाळ्या ता.अंबड जि.जालना यांनी यांच्या मुलगा च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र. नाव अर्जदाराशी नाते जन्म दिनांक

अनिकेत आनंद खरात मुलगा ३१/०३/२०१२

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक-२८/११/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरित/-
तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी, अंबड

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड यांचे न्यायालय**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६

जा.क्र.२०२६/सेतु/कावि-६५६ दिनांक-२४/०६/२०२६

अर्जदार श्रीमान/श्रीमती शाम दिलीप हंगारगे रा.दुनगाव ता.अंबड जि.जालना यांनी यांच्या भाचा च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र. नाव अर्जदाराशी नाते जन्म दिनांक

जोयेल नितीन कसबे भाचा ०१/०४/२०२२

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक-२८/११/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरित/-
तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी, अंबड

# पीकविमा भरपाईत अन्याय?

## प्रत्यक्ष कापणीच्या आधारावर भरपाई देण्याची कृषीमंत्र्यांकडे मागणी

पुणे / प्रतितिधी

प्रधानमंत्री पीकविमा योजनेअंतर्गत नुकसानभरपाई निश्चित करताना सध्या वापरली जाणारी तांत्रिक उत्पादन निश्चिती पद्धत प्रत्यक्ष शेतातील परिस्थितीचे अचूक चित्र दाखवत नसल्याने अनेक शेतकरी विमा भरपाईपासून वंचित राहत आहेत. त्यामुळे नुकसानभरपाई ठरविताना पीक कापणी प्रयोग हा मुख्य निकष मानण्यात यावा, अशी मागणी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे केली आहे.



आमदार पाटील यांनी कृषिमंत्र्यांना पाठविलेल्या पत्रात नमूद केले आहे की, २०२५-२६ हंगामात धाराशिव जिल्ह्यात तांत्रिक उत्पादन निश्चितीबाबत मोठ्या प्रमाणात तक्रारी प्राप्त झाल्या. अनेक शेतकऱ्यांचे प्रत्यक्ष उत्पादन कमी झाले असतानाही तांत्रिक आकडेवारीमुळे त्यांना अपेक्षित विमा भरपाई मिळाली नाही. यामुळे विद्यमान पद्धतीचा फेरविचार करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या संदर्भात परभणी येथील कृषी विद्यापीठातील तज्ज्ञांकडून अभ्यास करण्यात आला. या अभ्यासात तांत्रिक उत्पादन निश्चिती, प्रत्यक्ष पीक कापणी प्रयोग, हवामानातील बदल, अतिवृष्टी, शेतात पाणी साचणे, रोग-किडींचा प्रादुर्भाव आणि स्थानिक कृषी परिस्थितीचा तुलनात्मक आढावा घेण्यात आला. या अभ्यासातून तांत्रिक उत्पादन निश्चिती पद्धतीमध्ये गंभीर त्रुटी असल्याचे स्पष्ट झाल्याचा दावा करण्यात आला आहे. धाराशिव जिल्हाधिकाऱ्यांनीदेखील शासनाला पाठविलेल्या पत्रात तांत्रिक उत्पादन आणि प्रत्यक्ष उत्पादन यातील तफावत अधोरेखित केली आहे. त्यामुळे नुकसानभरपाई ठरविताना शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष उत्पादनाचा आधार घेण्यात यावा, अशी शिफारस करण्यात आली असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले. पीक कापणी प्रयोगाच्या आधारे नुकसानभरपाई निश्चित झाल्यास शेतातील प्रत्यक्ष उत्पादनाचा अधिक अचूक अंदाज मिळू शकतो. त्यामुळे अतिवृष्टी, दुष्काळ, रोग-किडी किंवा इतर नैसर्गिक आपत्तींमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना न्याय्य विमा भरपाई मिळण्याची शक्यता वाढेल. धाराशिवसह राज्यातील अनेक जिल्ह्यांतील शेतकरी आता कृषिमंत्र्यांच्या बैठकीतील निर्णयाकडे लक्ष ठेवून आहेत. राज्य सरकारने केंद्राकडे सकारात्मक भूमिका मांडून पीकविमा योजनेत आवश्यक बदल केल्यास भविष्यात हजारो शेतकऱ्यांना दिलासा मिळू शकतो.

### कृषिमंत्र्यांनी बोलावली उच्चस्तरीय बैठक

या विषयाची गंभीर दखल घेत कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी पुढील आठवड्यात उच्चस्तरीय बैठक बोलावली आहे. या बैठकीत खालील मुद्द्यांवर सविस्तर चर्चा होणार आहे. कृषी विद्यापीठाचा वैज्ञानिक अहवाल, धाराशिव जिल्हाधिकाऱ्यांच्या शिफारशी, विद्यमान तांत्रिक उत्पादन निश्चिती पद्धतीतील त्रुटी आणि पीक कापणी प्रयोगाला अधिक महत्त्व देण्याचा प्रस्ताव. बैठकीनंतर राज्य सरकार केंद्र शासन आणि केंद्रीय तांत्रिक सल्लागार समितीकडे शेतकऱ्यांच्या हिताची भूमिका मांडणार असल्याची माहिती आमदार पाटील यांनी दिली.

### या सुधारणा सुचविण्यात आल्या

पीकविमा भरपाईसाठी पीक कापणी प्रयोगाला प्रमुख निकष मान्यता द्यावी. तांत्रिक उत्पादन निश्चिती पद्धतीत आवश्यक बदल करावेत. कृषी विद्यापीठाच्या वैज्ञानिक अहवालाचा आधार घ्यावा. केंद्र शासन आणि केंद्रीय कृषी मंत्रालयाकडे पाठपुरावा करावा. पीकविमा योजनेच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये सुधारणा कराव्यात.

# फळपीक विमा अर्जासाठी मुदतवाढ; आता १४ जुलैपर्यंत उतरा विमा




पुणे / प्रतिनिधी

राज्यातील फळबागा असलेल्या शेतकऱ्यांना केंद्र सरकारने दिलासा दिला असून फळपीक विम्यासाठी अर्ज करण्याची मुदत आता वाढवण्यात आली आहे. पहिल्यांदा १४ जून व त्यानंतर ३० जून पर्यंत अर्जासाठी मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानंतर आता पुन्हा १४ जुलै २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

यंदा पावसाने उशिरा हजेरी लावल्यामुळे खरिपातील पिकांसोबत फळपिकांच्या उत्पादनावरही परिणाम होणार आहे. यातच यावर्षी मान्सूनचा पाऊसही सरासरीपेक्षा कमी पडणार असल्यामुळे शेतकऱ्यांसमोर संकट उभे राहिले आहे. फळपीक विमा योजनेच्या अंतर्गत ३० जून रोजी मुदत संपणाऱ्या संत्रा, द्राक्ष, लिंबू, पेरू, हळद आणि चिकू, मोसंबी या एकूण ७ पिकांच्या फळपीक विम्यासाठी अर्ज करण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्य शासनाच्या विनंतीवरून केंद्र शासनाने यासाठी मंजुरी दिली आहे. संत्रा, द्राक्ष, लिंबू, पेरू, हळद आणि चिकू, मोसंबी या पिकांसाठी शासनाची अधिसूचना उशिरा निघाली होती, त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना वेळेत पिक विमा भरता आला नसल्याने अंतिम मुदत वाढवण्याची मागणी करण्यात आली होती. राज्यातील सर्व अधिसूचित जिल्ह्यांमध्ये आणि ८ क्लस्टरसाठी ही मुदत लागू असणार आहे. कर्जदार आणि बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी फळपीक विम्यासाठी १४ जुलैपर्यंत अर्ज करण्यात येणार आहे.

# गांडुळाच्या शेतीतून मिळते लाखो रुपयांचे उत्पन्न

भारतातील बहुतांश शेतकरी शेतीसाठी सामान्य पिके निवडतात. धान, गहू, भाजीपाला याच्या वर चढून शेतकरी इतर कशाचाही विचार करू शकत नाहीत, त्यामुळे त्यांचे नुकसान होत आहे. गांडुळ खताचा व्यवसाय सर्वांत अधिक उत्पन्न देणारा आहे. हा व्यवसाय भारतात झपाट्याने फोफावत आहे आणि येथील अनेक शेतकरी त्याचा पुरेपूर फायदा घेत आहेत.

गांडूळ खताचा असा होतो व्यवसाय : गांडुळ खताचा व्यवसाय कोणीही अगदी सहज सुरू करू शकतो. यासाठी कोणत्याही मोठ्या खर्चाची गरज नाही. तुम्ही तुमच्या बचतीतून किंवा सरकारने दिलेल्या अनुदानातून हा व्यवसाय सुरू करू शकता. जर तुम्ही यात मेहनत करून तुमचा व्यवसाय पुढे नेलात तर तुम्हाला चांगला नफा मिळू शकतो. तुमचे उत्पन्न काही वेळात दुप्पट होईल आणि तुमचे कामही चालू राहील. जसा काळ बदलत आहे, तशा बाजाराच्या मागण्याही बदलत आहेत. लोक आता आपली शेती करण्याची पद्धत बदलत आहेत. आजकाल लोक रासायनिक शेतीऐवजी सेंद्रिय शेतीवर अधिक भर देत आहेत. त्यासाठी त्यांना सेंद्रिय खतांचीही गरज आहे. सेंद्रिय खते तयार करण्यासाठी पाने, माती, शेण इत्यादींची सर्वाधिक आवश्यकता असते.सरकारी अनुदान : त्यामुळे बाजारात गांडुळ खताची मागणी वाढत आहे. सरकारही सेंद्रिय खताला प्रोत्साहन देत आहे. यासाठी शासनाकडून शेतकऱ्यांना अनुदान स्वरूपात मदतही दिली जात आहे. सहकारी संस्था, बचतगट अशा ठिकाणांहून हे अनुदान घेऊन शेतकरी स्वत:चे प्लांट सुरू करू शकतात. वास्तविक, सरकार तुमचे उत्पादन पुढे नेण्यासाठी सबसिडी देते, जेणेकरून तुम्ही तुमचे उत्पादन चांगल्या पातळीवर करू शकता. जर तुम्हाला छोट्या प्रमाणावर काम सुरू करायचे असेल तर सरकार त्यासाठी कमी सबसिडी देईल आणि जर तुम्ही मोठ्या प्रमाणावर काम केले तर सरकार त्यासाठी जास्त सबसिडी देईल.



# कपाशीच्या सघन लागवडीत खत व्यवस्थापन

कपाशीची सघन लागवड ही कमी क्षेत्रातून अधिक उत्पादन मिळवून देणारी आधुनिक लागवड पद्धत म्हणून शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय होत आहे. मात्र, या पद्धतीत फक्त रोपांची संख्या वाढवून चालत नाही, तर योग्य खत व्यवस्थापन करणे अत्यंत आवश्यक असते. संतुलित अन्नद्रव्यांचा पुरवठा झाल्यास झाडांची वाढ चांगली होते, बोंडधारणा वाढते आणि उत्पादनात लक्षणीय वाढ होते. त्यामुळे सघन लागवड करताना खतांचे योग्य नियोजन करणे ही यशाची गुरुकिल्ली आहे. खत व्यवस्थापनाचे महत्त्व : सघन लागवडीत प्रति एकर झाडांची संख्या जास्त असल्यामुळे जमिनीतील अन्नद्रव्यांची मागणीही वाढते. जर वेळेवर आणि संतुलित प्रमाणात खतांचा वापर केला नाही, तर झाडांची वाढ खुंटणे, बोंडांची संख्या कमी होणे आणि उत्पादन घटणे यांसारख्या समस्या निर्माण होऊ शकतात. त्यामुळे मातीतील उपलब्ध अन्नद्रव्यांचा विचार करून खत व्यवस्थापन करणे आवश्यक आहे.



माती परीक्षणाला : खतांचा वापर करण्यापूर्वी माती परीक्षण करून जमिनीत कोणत्या अन्नद्रव्यांची कमतरता आहे हे जाणून घ्यावे. त्यानुसार नत्र, स्फुरद, पालाश तसेच गंधक, झिंक आणि बोरॉनसारख्या सूक्ष्म अन्नद्रव्यांचा समावेश करावा. माती परीक्षणाच्या आधारे खतांचे नियोजन केल्यास उत्पादन वाढण्यासोबतच खतांवरील खर्चही कमी होतो.

सेंद्रिय खतांचा वापर : जमिनीची सुपीकता टिकवून ठेवण्यासाठी शेणखत, कंपोस्ट, गांडूळखत किंवा इतर सेंद्रिय खतांचा वापर करणे फायदेशीर ठरते. यामुळे जमिनीची पाणी धारण क्षमता वाढते, सूक्ष्मजीवांची संख्या वाढते आणि रासायनिक खतांचा परिणाम अधिक प्रभावी होतो.

रासायनिक खतांचा वापर : सघन लागवडीत एकाच वेळी संपूर्ण खत देण्याऐवजी टप्प्याटप्प्याने खतांचा वापर करावा. पेरणीपूर्वी मूलभूत खतांचा वापर करावा. वाढीच्या अवस्थेनुसार नत्राचे विभाजित हप्त्यांमध्ये नियोजन करावे. बोंडधारणेच्या काळात पालाशयुक्त खतांचा पुरवठा वाढवावा. सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता दिसल्यास तज्ज्ञांच्या सल्ल्याने फवारणी करावी.

ठिबक सिंचनासोबत फर्टिगेशनचा वापर : ज्या शेतकऱ्यांकडे ठिबक सिंचन व्यवस्था आहे त्यांनी फर्टिगेशन पद्धतीचा वापर करावा. या पद्धतीत पाण्यासोबत विद्राव्य खतांचा पुरवठा थेट मुळांपर्यंत होतो. त्यामुळे खतांचा कार्यक्षम वापर होतो, उत्पादन वाढते आणि खतांचा अपव्यय कमी होतो.

खत व्यवस्थापन : पिकाची नियमित पाहणी आवश्यक. खत दिल्यानंतर पिकाची नियमित पाहणी करणे आवश्यक आहे. पानांचा रंग, वाढ, फुलांची संख्या आणि बोंडधारणा यावरून पिकाची पोषणस्थिती ओळखता येते. कमतरतेची लक्षणे दिसल्यास त्वरित योग्य उपाययोजना करावी.

लागवडीत लक्षात ठेवावयाच्या बाबी : माती परीक्षणानुसार खतांचा वापर करावा. सेंद्रिय व रासायनिक खतांचा संतुलित वापर करा. नत्राचे विभाजित हप्त्यांमध्ये नियोजन करा. ठिबक सिंचन असल्यास फर्टिगेशनचा वापर करा. सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता टाळा. पिकाच्या वाढीनुसार खत व्यवस्थापनात आवश्यक बदल करा. कपाशीच्या सघन लागवडीत अधिक उत्पादन मिळवण्यासाठी योग्य खत व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे आहे. केवळ अधिक झाडांची लागवड करून अपेक्षित उत्पादन मिळत नाही. माती परीक्षण, संतुलित खतांचा वापर, सेंद्रिय खतांचा समावेश, फर्टिगेशन आणि पिकाची नियमित पाहणी या उपायांचा अवलंब केल्यास उत्पादनात वाढ होऊन शेती अधिक फायदेशीर ठरू शकते. सघन लागवड यशस्वी करण्यासाठी खत व्यवस्थापनाला प्राधान्य देणे आवश्यक आहे.




### महत्वाच्या घटना

१५०७ : इंग्लंड आणि नेदरलँड्स या दोन्ही देशांनी व्यापार करारावर आपली सहमती दर्शविली.

१६५९ : मुघल बादशाहा औरंगजेब यांनी दिल्ली येथे राज्याभिषेक केला.

१८४९ : डेन्मार्कने नवीन संविधान अंगिकारले व संवैधानिक राजेशाही कायम केली.

१८६४ : अमेरिकन यादवी युद्ध-पीडमाँटची लढाई दक्षिणेचा पराभव.

१९०७ : स्वामीनारायण पंथाची स्थापना.

१९१५ : डेन्मार्कमधे महिलांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला.

१९२४ : अर्न्स्ट अलेक्झांडरसनने पहिला फॅक्स संदेश स्वतःच्या वडिलांना पाठवला.

१९५२ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना कोलंबिया विद्यापीठाने डॉक्टर ऑफ लॉ ही सन्मान पदवी दिली.

१९५९ : सिंगापूरमधील पहिल्या सरकारची स्थापना झाली.

१९६८ : अमेरिकेच्या अध्यक्षपदचे उमेदवार रॉबर्ट एफ. केनेडी यांचा गोळी मारण्यात आली, पुढील दिवशी केनेडी मरण पावले.

१९७५ : १९६७ पासून आठ वर्षे वाहतूकीसाठी बंद असलेला 'सुवेझ कालवा' पुन्हा आंतरराष्ट्रीय वाहतुकीसाठी खुला करण्यात आला.

१९७४ : जागतिक पर्यावरण दिन

१९७७ : सेशेल्समधे उठाव झाला.

१९८० : भारतातील संघटित कामगार चळवळीचे जनक व ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसचे एक संस्थापक नारायण मल्हार जोशी यांच्या सन्मानार्थ टपाल तिकीटाचे अनावरण करण्यात आले.

१९८४ : अमृतसरच्या सुवर्ण मंदिरात लपून बसलेल्या अतिरेक्यांचा बीमोड करण्यासाठी भारतीय पंतप्रधान इंदिरा गांधीने मंदिरावर हल्ला करण्याचा आदेश दिला.

१९८९ : चीनची राजधानी बिजींगच्या तियेनआनमेन चौकातील चळवळीदरम्यान एका अज्ञात निःशस्त्र व्यक्तीने रणगाड्यासमोर उभे राहून रणगाडा थांबवला. हे छायाचित्र या चळवळीचा मानबिंदू ठरले.

१९९४ : ब्रायन लारा यांनी नाबाद ५०१ धावा करून प्रथम दर्जाच्या क्रिकेटमध्ये नवीन जागतिक विक्रम प्रस्थापित केला.

२००३ : पाकिस्तान आणि भारतामध्ये तीव्र उष्णतेची लाट आल्यामुळे तापमान ५० डिग्री सेल्सिअस पेक्षा जास्त झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७२३ : स्कॉटिश अर्थशास्त्रज्ञ आणि तत्त्ववेत्ता ॲडम स्मिथ यांचा जन्म. (मृत्यू: १७ जुलै १७९०)

१८७९ : नारायण मल्हार जोशी, भारतातील संघटित कामगार चळवळीचे जनक.

१८८१ : हार्मोनियम वादक, अभिनेते व संगीतकार, नाट्यसंगीताचे पहिले शिल्पकार, पहिल्या बोलपटाचे संगीत दिग्दर्शक, संगीत क्षेत्रातील पहिले सौंदर्य मीमांसक, संगीतिकांचे प्रवर्तक गोविंदराव टेंबे यांचा जन्म. (मृत्यू: ९ ऑक्टोबर १९५५)

१८८३ : ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ जॉन मायनार्ड केन्स यांचा जन्म. (मृत्यू: २१ एप्रिल १९४६)

१९०० : डेनिस गॅबॉर, हंगेरीयन, ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेता.

१९०८ : कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया चे सहसंस्थापक रवि नारायण रेड्डी यांचा जन्म. (मृत्यू: ७ सप्टेंबर १९९१)

१९४५ : अंबर रॉय, भारतीय क्रिकेट खेळाडू.

१९४६ : विल्यम्स एफ टीम चे सहसंस्थापक पॅट्रिक हेड यांचा जन्म.

१९५० : हरिश्चंद्र माधव बिराजदार, मराठी पहिलवानी कुस्तीगीर.

१९६१ : भारतीय टेनिस खेळाडू आणि प्रशिक्षक रमेश कृष्णन यांचा जन्म.

१९७२ : भारतीय पुजारी आणि राजकारणी योगी आदित्यनाथ यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९१० : अमेरिकन लघुकथा लेखक ओ. हेनरी यांचे निधन.

१९१६ : लॉर्ड होरेशियो किचनर, ब्रिटीश फील्ड मार्शल, भारताचा व्हाईसरॉय.

१९४२ : स्वातंत्र्यपूर्व भारतातील प्रतिभाशाली गझल आणि गीत गायक मास्टर मदन यांचे निधन.

१९५० : कुस्तीगीर व प्रशिक्षक हरिश्चंद्र बिराजदार यांचे निधन. (जन्म: १४ सप्टेंबर २०११)

१९७३ : मा. स. गोळवलकर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे दुसरे सरसंघचालक.

१९८७ : ग. ह. खरे, इतिहासतज्ज्ञ.

१९९६ : भारतीय कवि आणि विद्वान आचार्य कुबेर नाथ राय यांचे निधन. (जन्म: २६ मार्च १९३३)

१९९९ : राजमाता श्रीमंत छत्रपती सुमित्राराजे शाहूमहाराज भोसले यांचे निधन.

२००४ : अभिनेते आणि अमेरिकेचे ४० वे राष्ट्राध्यक्ष रोनाल्ड रेगन यांचे निधन. (जन्म: ६ फेब्रुवारी १९११)

२०१६ : एलिनॉर झेलियट (अमेरिकन लेखिका आणि इतिहासकार, जन्म: ८ ऑक्टोबर १९२६).

२०१७ : भारतातील श्रीहरीकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्र येथून सर्वात जास्त जड वजनी ''जीएसएलव्ही मार्क -३ डी -१'' रॉकेट्? चे यशस्वी प्रक्षेपण करण्यात आलं.

# श्री संत मुक्ताबाई पालखी जालन्यात दाखल

जालना । प्रतिनिधी

वारकरी संप्रदायासाठी अत्यंत आनंदाची व ऐतिहासिक बाब म्हणजे श्री संत मुक्ताबाई संस्थान, मुक्ताईनगर येथील पालखीचा जालना जिल्ह्यात प्रथमच रिंगण सोहळा आयोजित करण्यात आला असून, हा वारकरी परंपरेतील एक ऐतिहासिक आणि अविस्मरणीय क्षण ठरणार आहे. जिल्हा प्रशासनाच्या पुढाकारातून व विविध शासकीय विभागांच्या समन्वयाने हा सोहळा अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने आयोजित करण्यात आला आहे.श्री संत मुक्ताबाई यांची पालखी दि. ०४ जुलै २०२६ रोजी जालना जिल्ह्यात प्रवेश केला आहे. श्री विठ्ठल-रुक्मिणी संस्थान, कन्हैयानगर, जालना येथे पालखीचा मुक्काम राहणार आहे. पालखी मुक्कामाच्या ठिकाणी जिल्हा प्रशासनामार्फत भाविक वारकरी, दिंडी तसेच सेवेकऱ्यांसाठी आवश्यक त्या सर्व नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यामध्ये वॉटरप्रूफ मंडप, अखंडित वीजपुरवठा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृहे, आरोग्य सेवा, रुग्णवाहिका, डास प्रतिबंधक फवारणी, पोलीस बंदोबस्त, वाहतूक व्यवस्थापन, अग्निशमन सेवा, पशुवैद्यकीय सुविधा तसेच इतर आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

संत मुक्ताबाई पालखीच्या जालना जिल्ह्यात प्रथमच आयोजित करण्यात येत असलेल्या ऐतिहासिक रिंगण सोहळ्याच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाने व्यापक नियोजन केले असून, विविध विभागांतील एकूण ३२५+ अधिकारी व कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. यामध्ये २२५ पोलीस अधिकारी व कर्मचारी, जालना शहर महानगरपालिकेची स्वच्छता, पाणीपुरवठा, प्रकाश व्यवस्था व नागरी सुविधांसाठी नियुक्त २ विशेष पथके (एकूण ३८ अधिकारी/कर्मचारी), २ आरोग्य पथके (एकूण ३३ अधिकारी/कर्मचारी), ४ रुग्णवाहिका, २ अग्निशमन वाहने, महावितरणची २ तांत्रिक पथके, २ पशुवैद्यकीय पथके तसेच विविध



विभागांची, आरोग्य सेवेस, अखंडित वीजपुरवठ्यास, स्वच्छतेस तसेच इतर सर्व नागरी सुविधांना सर्वोच्च प्राधान्य देत सर्व संबंधित यंत्रणा पूर्ण समन्वयाने कार्यरत राहणार आहेत. त्यानंतर दि. ०५ जुलै २०२६ रोजी सकाळी ७.३० ते ९.३० या वेळेत जे.ई.एस. महाविद्यालय, जालना येथे संत मुक्ताबाई पालखीचा प्रथम ऐतिहासिक रिंगण सोहळा मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात संपन्न होणार आहे. या सोहळ्यासाठी जिल्हा प्रशासनाने व्यापक नियोजन केले असून, कार्यक्रमस्थळी मंच व्यवस्था, ध्वनी व्यवस्था, नियंत्रण कक्ष, आरोग्य सुविधा, रुग्णवाहिका, अग्निशमन पथक, पोलीस बंदोबस्त, वाहतूक नियोजन, पिण्याचे पाणी, स्वच्छता, पार्किंग व्यवस्था तसेच भाविकांसाठी आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. रिंगण सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी, पालकमंत्री महोदय यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, आयुक्त, शहर महानगरपालिका, निवासी उपजिल्हाधिकारी, उप विभागीय अधिकारी, तहसीलदार, महसूल, पोलीस, आरोग्य, महानगरपालिका, सार्वजनिक बांधकाम, महावितरण, अग्निशमन, पशुसंवर्धन, जिल्हा परिषद, परिवहन तसेच इतर सर्व संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी यांना विभागनिहाय जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या असून सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. या ऐतिहासिक सोहळ्यास पालकमंत्री पंकजा मुंडे तसेच वारकरी संप्रदायातील संत, महंत व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. जिल्हा प्रशासनाच्या वतीने सर्व भाविकांच्या सुरक्षितता, सुविधा व सुयोग्य व्यवस्थापनास सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले असून, सर्व संबंधित यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यरत राहणार आहेत. भाविकांनी प्रशासनाने केलेल्या वाहतूक नियोजन, पोलीस प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे. संत मुक्ताबाई पालखीचा जालना जिल्ह्यात प्रथमच आयोजित होत असलेला हा ऐतिहासिक रिंगण सोहळा वारकरी परंपरेच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदला जाईल. या भक्तिमय, सांस्कृतिक व ऐतिहासिक सोहळ्याचा लाभ घेण्यासाठी जालना जिल्ह्यातील तसेच परिसरातील सर्व वारकरी, भाविक, नागरिक आणि युवक-युवती यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या अभूतपुर्व सोहळ्याचे साक्षीदार व्हावे, असे जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे.

## जालना ते लंडन थारमधून ऐतिहासिक कार प्रवास

### बजाज दाम्पत्याचा भास्कर आबा दानवे यांच्या हस्ते सत्कार



जालना । प्रतिनिधी

जालना शहरातील हौशी कारचालक राजेश बजाज व सौ. सोनी बजाज यांनी आपल्या थार गाडीने जालना ते लंडन असा ऐतिहासिक व प्रेरणादायी कार प्रवास यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल भाजप महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांचा सत्कार केला. यावेळी बजाज दाम्पत्याशी संवाद साधताना त्यांनी या ७१ दिवसांच्या आंतरराष्ट्रीय प्रवासातील विविध अनुभव सांगितले. भारतासह १९ देशांमधून तब्बल १७,६८३ किलोमीटरचे अंतर त्यांनी स्वतः वाहन चालवत पूर्ण केले. या मोहिमेसाठी त्यांनी मागील तीन वर्षांपासून आवश्यक नियोजन, कागदपत्रांची पूर्तता, वाहनाची तयारी तसेच विविध देशांतील वाहतूक नियमांचा सखोल अभ्यास केला होता.

एडव्हेंचर्स ओव्हरलँड, गुरुग्राम यांच्या वतीने आयोजित ही मोहीम १४ एप्रिल ते १९ जून २०२६ या कालावधीत पार पडली. जालन्यातील लोखंडी पुलावरून प्रवासाला प्रारंभ झाल्यानंतर गोरखपूर येथून अधिकृत मोहिमेला सुरुवात झाली. भारत, नेपाळ, चीन, किर्गिस्तान, उझबेकिस्तान, कझाकस्तान, रशिया, जॉर्जिया, तुर्किये, बल्गेरिया, सर्बिया, क्रोएशिया, हंगेरी, स्लोव्हाकिया, झेकिया, जर्मनी, नेदरलँड्स, बेल्जियम आणि फ्रान्स असा प्रवास करत त्यांनी १९ जून रोजी लंडन गाठले. या प्रवासादरम्यान विविध देशांतील भाषा, हवामान, सीमाशुल्क प्रक्रिया आणि वाहतूक नियमांचा त्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला. चीनमध्ये उजव्या बाजूने वाहन चालविण्याच्या पद्धतीमुळे काही आव्हाने निर्माण झाली होती. मात्र आत्मविश्वास आणि अनुभवाच्या बळावर त्यांनी ती यशस्वीपणे पार केली. तसेच सौ. सोनी बजाज यांनी सुमारे २,००० किलोमीटर वाहन चालवत या मोहिमेत महत्त्वपूर्ण योगदान दिले.यावेळी भास्कर आबा दानवे यांनी बजाज दाम्पत्याचे अभिनंदन करत, ''जालना शहराचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर अभिमानाने पोहोचविणारे हे यश संपूर्ण जिल्ह्यासाठी गौरवाची बाब आहे. त्यांच्या जिद्द, नियोजन आणि चिकाटीमुळे अनेक युवकांना मोठी स्वप्ने पाहण्याची प्रेरणा मिळेल,'' असे सांगितले.याप्रसंगी भाजपा जिल्हाउपाध्यक्ष सिद्धिविनायक मुळे,नगरसेवक अर्जुन गेही,राजेश जोशी,नागेश अंभोरे व बजाज कुटुंबीय उपस्थित होते.

## सातत्यपूर्ण अभ्यास, नियोजन व परिश्रमाच्या बळावर मिळते यश

### पोलीस उपायुक्त इंगळे यांचे प्रतिपादन; पुरस्कार वितरण

अहिल्यानगर । प्रतिनिधी

यशाला कोणताही शॉर्टकट नसतो; कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास, योग्य नियोजन आणि आत्मविश्वास यांच्या बळावर कोणताही विद्यार्थी उच्च पदापर्यंत पोहोचू शकतो. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्येही अपार क्षमता असून योग्य ध्येय निश्चित करून चिकाटीने प्रयत्न केल्यास पोलीस, प्रशासकीय सेवा, तसेच विविध शासकीय क्षेत्रांतील उच्च पदे सहज गाठता येतात, असा विश्वास पिंपरी चिंचवड येथील पोलीस उपायुक्त गणेश इंगळे यांनी व्यक्त केला. अपयशाला घाबरून न जाता त्यातून शिकत पुढे जाण्याचा आणि समाजासाठी आदर्श व्यक्तिमत्त्व घडविण्याचा संदेशही त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

विश्वकर्मा वंशीय समाज संघटनेच्या अहिल्यानगर जिल्हा शाखेच्यावतीने शिर्डी येथील शुभारंभ लॉन्स व मंगल कार्यालयात विद्यार्थी गुणगौरव व समाजरत्न पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. संघटनेचे राज्य सचिव प्रा. विलास पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सोहळ्यात कार्याध्यक्ष अरुण भालेकर, उपाध्यक्ष गोपाल राऊत, धनराज वेलणकर, राजेश नागापुरे, प्रमोद वेलकर माजी मुख्याध्यापक तानाजी शेटे आदी उपस्थित होते. राज्य कार्याध्यक्ष अरुण भालेकर म्हणाले, समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध शासकीय योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. यावेळी समाजातील समाजरत्न पुरस्कार प्राप्त मान्यवरांच्या कार्याचा आदर्श विद्यार्थ्यांनी डोळ्यासमोर ठेवून शिक्षण, सामाजिक बांधिलकी आणि कर्तृत्वाच्या बळावर स्वतःचे उज्ज्वल भविष्य घडवावे. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. पवार म्हणाले, विद्यार्थ्यांना जर कमी वयात व कमी खर्चात नोकरीला मिळवायची असेल तर त्यांनी दहावीनंतर किंवा बारावीनंतर लगेच एअरफोर्स, नेव्हीफोर्स, आर्मी किंवा पोलीस यामध्ये प्रयत्न करावा. ज्या पालकांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे त्या विद्यार्थ्यांनी जेईई, नीट याची तयारी करून डॉक्टर, इंजिनियर, वकील, किंवा उच्च शिक्षण घेऊन उच्च पदे मिळवावीत. जिल्हाध्यक्ष प्रसाद गडकर यांनी प्रास्ताविक केले. सुभाष तमानके व आदिनाथ भालेकर यांनी सूत्रसंचालन केले. आदिनाथ भालेकर यांनी आभार मानले.

## संभाजीनगर जिल्हा बँक निवडणुकीत महायुतीचा धनशक्तीने विजय

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीत महायुतीने २० पैकी १८ जागा जिंकून स्पष्ट बहुमत मिळवले आहे. या विजयावर काँग्रेसचे खासदार कल्याण काळे यांनी गंभीर आरोप केला आहे. ही निवडणूक 'धनशक्ती'च्या जोरावर जिंकली असून, मतदारांना कंटाळा येईपर्यंत पैसे वाटण्यात आल्याचे काळे यांनी म्हटले आहे. रविवारी सकाळी आठ वाजल्यापासून जिल्हा मध्यवर्ती बँकेत मतमोजणीला सुरुवात झाली. महायुतीने संचालक मंडळ निवडणुकीत निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले. काँग्रेसला केवळ एक जागा मिळाली, तर उद्धवसेनेलाही एक जागा मिळाली.

निवडणुकीतील सर्वाधिक चर्चेच्या बिगर शेती मतदारसंघात काँग्रेसचे खासदार कल्याण काळे यांनी अभिजीत देशमुख यांचा पराभव केला. काळे यांना ४८ मते मिळाली, तर देशमुख यांना २६ मतांवर समाधान मानावे लागले. बिगर शेती मतदारसंघातून महायुतीचे अतुल सावे (२६७ मते), अंबादास दानवे (२१०), रामराव (रामूकाका) शेळके (२३७), अर्जुन

### मतदारांना कंटाळा येईपर्यंत पैसे वाटले

पाटील (२२३) आणि रवींद्र काळे (१८९) हे पाचही उमेदवार विजयी झाले. इतर मतदारसंघातून आमदार अनुराधा चव्हाण (७४९ मते), मुक्ता तांगडे (६४० मते) आणि सुवर्णा जाधव (५४० मते) यांनीही विजय मिळवला.खासदार कल्याण काळे यांनी आपल्या आरोपाचा पुनरुच्चार करत म्हटले की, ''जिल्हा मध्यवर्ती बँकेची निवडणूक महायुतीने धनशक्तीच्या जोरावर जिंकली आहे. शेतकऱ्यांच्या या बँकेत मतदारांना मोठ्या प्रमाणात पैसे वाटण्यात आले. लोकांना कंटाळा येईपर्यंत भेटून प्रत्येक भेटीत पैसे दिले गेले. त्यामुळे ही निवडणूक धनशक्तीवर जिंकली गेली.'' या आरोपांना ओबीसी विकास मंत्री अतुल सावे यांनी प्रत्युत्तर दिले आहे. सावे म्हणाले, ''मतदारांनी आम्हाला पाठिंबा दिला आहे. मग कल्याण काळे यांचा विजय धनशक्तीने झाला का, हे त्यांनी स्पष्ट करावे. लोक आमच्या पाठीशी आहेत.

## लासूर रेल्वे गेट बंद राहिल्याने डोणगावच्या व्यक्तीचा मृत्यू

लासूर । प्रतिनिधी

येथील रेल्वे गेट वेळेत न उघडल्याने रुग्णालयात पोहोचण्यास विलंब झाला आणि डोणगाव येथील हरिदास रुस्तम वाकळे (४३) या व्यक्तीला आपले प्राण गमवावे लागले. ही घटना शुक्रवारी सकाळी घडली. या घटनेमुळे रेल्वे प्रशासनाविरोधात नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी सकाळी ८ वाजेच्या सुमारास हरिदास वाकळे यांच्या छातीत तीव्र वेदना सुरू झाल्या. त्यांच्या पत्नी व भावाने त्यांना तातडीने खासगी वाहनातून लासूर स्टेशन येथील रुग्णालयात नेण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्याच वेळी रेल्वे गेट बंद असल्याने रस्त्याच्या दोन्ही बाजूंना वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. रेल्वे गेल्यानंतर गेट उघडले खरे, परंतु वाहतूक कोंडीमुळे वाकळे यांचे वाहन बाहेर काढण्यासाठी १५ ते २० मिनिटांचा वेळ वाया गेला. त्यानंतर त्यांना सावंगी येथील खासगी रुग्णालयात दाखल केले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. हरिदास वाकळे यांच्या पश्चात आई, पत्नी व दोन मुले असा परिवार आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. रेल्वे उड्डाणपूल उभारण्याची मागणी ११ जून रोजीदेखील अशाच प्रकारे रेल्वे गेट बंद असल्यामुळे वेळेत उपचार न मिळाल्याने जावेद मन्सुरी यांचा मृत्यू झाला होता. एकाच महिन्यात दोन निरपराध नागरिकांचा बळी गेल्याने लासूर स्टेशन येथे तातडीने रेल्वे उड्डाणपूल किंवा पर्यायी व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी डोणगाव व परिसरातील ग्रामस्थांनी केली आहे.



जालना: जेईस महाविद्यालयाच्या प्रांगणावर आदिशक्ती संत मुक्ताबाई यांच्या पालखीचे भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष श्री. भास्कर आबा दानवे यांनी मनोभावे दर्शन घेतले.


## दूषित पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात

### नेवासेतील ज्ञानेश्वर कॉलनीत समस्यांचा विळखा, नागरिक आंदोलनाच्या पवित्र्यात

नेवासा । प्रतिनिधी

पावसाळापूर्व कामांकडे नगरपंचायतीच्या दुर्लक्षामुळे ज्ञानेश्वर कॉलनीतील शेकडो नागरिकांचे जीवन सध्या सांडपाण्याच्या संकटात सापडले आहे. साचलेल्या पाण्यामुळे बोअरवेल दूषित झाल्याचा आरोप, फुटलेल्या जलवाहिनीतून पाणीपुरवठा दूषित होत असल्याची भीती आणि अतिवृष्टीत पुन्हा पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

बसस्थानक, पोलीस लाईन व गंगानगर भागातील सांडपाणी तसेच पावसाचे पाणी वाहून नेणारा नैसर्गिक मार्ग मुख्य रस्त्यालगतच्या नालीवर टाकलेल्या मातीच्या भरावामुळे पूर्णपणे बंद झाला आहे. परिणामी परिसरात सांडपाण्याचे मोठे तळे तयार झाले असून त्याचा विळखा आता संपूर्ण ज्ञानेश्वर कॉलनीला पडला आहे.शहरात आठ-आठ दिवस नळाला पाणी येत नसल्याने नागरिकांना बोअरवेलवर अवलंबून



राहावे लागत आहे. मात्र, साचलेल्या सांडपाण्यामुळे भूजल दूषित झाल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. दुर्गंधी, डासांचा वाढलेला प्रादुर्भाव आणि साथीच्या रोगांचा धोका यामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक व महिलांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. याहून धक्कादायक बाब म्हणजे, साचलेल्या सांडपाण्यातूनच शहराची मुख्य पाणीपुरवठा जलवाहिनी जात असून ती काही ठिकाणी फुटल्याने गटाराचे दूषित पाणी थेट पाइपलाइनमध्ये मिसळत असल्याचा आरोप केला जात आहे. त्यामुळे नळाद्वारे घराघरात दूषित पाणी पोहोचत असल्याने नगरपंचायत नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करत असल्याचा संतप्त आरोप परिसरातील नागरिकांनी केला आहे. नालीवरील मातीचा भराव तातडीने हटवून नैसर्गिक पाण्याचा प्रवाह पूर्ववत करावा, साचलेल्या सांडपाण्याचा त्वरित निचरा करावा आणि फुटलेली जलवाहिनी तात्काळ दुरुस्त करावी, अन्यथा नगरपंचायत कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

तत्काळ कार्यवाही करणार : गांगुर्डे

''ज्ञानेश्वर कॉलनीतील सांडपाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी काम तातडीने हाती घेण्यात येणार आहे. जेसीबीच्या साहाय्याने दोन ते तीन दिवसांत नाली मोकळी करून पाण्याचा नैसर्गिक प्रवाह पूर्ववत करण्यात येईल. नागरिकांची गैरसोय दूर करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही केली जाईल.

## जामनेरात स्व. वसंतराव नाईक यांच्या स्मारकाचे भूमिपूजन

### गिरीश महाजन यांच्या प्रयत्नातून साकारणार दीड कोटींचा प्रकल्प



जामनेर । प्रतिनिधी

जामनेर हरितक्रांतीचे प्रणेते स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त मंत्री गिरीश महाजन यांच्या प्रयत्नातून जामनेर शहरातील वसंतराव नाईक चौकामध्ये हरितक्रांतीचे प्रणेते स्व.वसंतराव नाईक यांचा १४ फुटी पुतळा उभारण्यात येत आहे.या पुतळ्याचे भूमिपूजन नगराध्यक्ष साधना महाजन यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपा जिल्हाध्यक्ष चंद्रकांत बाविस्कर, उपनगराध्यक्ष डॉ. प्रशांत भोंडे, गटनेत्या संध्या पाटील, ज्येष्ठ नेते जे.के. चव्हाण, माजी उपनगराध्यक्ष महेंद्र बाविस्कर, मुख्याधिकारी नितीन बागुल, माजी जि.प. सदस्य पती विलास पाटील, नगरसेवक बाबुराव हिवराळे सुहास पाटील यांच्यासह नगरसेवक व सर्व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. .यावेळी मार्गदर्शन करताना जे.के.चव्हाण म्हणाले की, स्वर्गीय वसंतराव नाईक हे खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांचे नेते होते. हजारो हाताला काम व पोटाला अन्न मिळावे म्हणून त्यांनी शेतकरी, शेतमजूर यांच्यासाठी रोजगार हमी योजना आणली. असे ते म्हणाले.

# बीडच्या इतिहासात प्रथमच शालेय वाहतूक सुरक्षिततेवर भव्य कार्यशाळा

## जिल्हा वाहतुक शाखा, आरटीओ कार्यालय आणि रोटरी क्लबचा संयुक्त उपक्रम

बीड । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीला सर्वोच्च प्राधान्य देत बीडच्या इतिहासात प्रथमच शालेय वाहतूक सुरक्षिततेवर व्यापक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. जिल्हा वाहतूक शाखा, बीड, रोटरी सेंटर फॉर रोड सेफ्टी अँड ट्रॅफिक अवेअरनेस तथा रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन यांच्या संयुक्त विद्यमाने श्री बंकटस्वामी महाविद्यालय, जालना रोड, बीड येथे शुक्रवार दि.४ जुलै २०२६ रोजी झालेल्या या कार्यशाळेत शाळांचे मुख्याध्यापक, शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य, स्कूल बस व रिक्षा चालक, अटेंडंट, पालक प्रतिनिधी आणि रोटरी सदस्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी सर्व संबंधित घटकांमध्ये समन्वय निर्माण करून रस्ता सुरक्षा जनजागृतीला बळ देणारा हा उपक्रम ठरला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर धांडे होते. प्रमुख उपस्थितीमध्ये रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनचे अध्यक्ष रो. चंद्रप्रकाश सेठी, सचिव रो. मनोज थीगळे, रोटरी सेंटर फॉर रोड सेफ्टी अँड ट्रॅफिक अवेअरनेसचे संचालक प्रो. डॉ. प्रकाश कोंका, मुख्य सल्लागार रो. इंजी. राहुल बोरा, जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक वैभव पाटील, पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, मोटार वाहन निरीक्षक रणजीत पाटील, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक शशिकांत जाधव तसेच उपप्राचार्य प्रो. डॉ. शंकर शिवशेट्टे उपस्थित होते. कार्यशाळेचे प्रमुख प्रशिक्षक प्रो. डॉ. प्रकाश कोंका यांनी पॉवर पॉइंट



सादरीकरणाद्वारे शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीचे विविध पैलू प्रभावीपणे उलगडून सांगितले. रस्ता सुरक्षा नियम, वाहनांतील ब्लाइंड स्पॉट, स्कूल बस व रिक्षांसाठी आवश्यक सुरक्षा निकष, शासनाच्या मार्गदर्शक सूचना तसेच शाळा व्यवस्थापन, मुख्याध्यापक, पालक, चालक, अटेंडंट आणि विद्यार्थ्यांच्या जबाबदार्यांवर त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांची सुरक्षा ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असून प्रत्येकाने आपली भूमिका प्रामाणिकपणे पार पाडल्यास अपघातांना मोठ्या प्रमाणात आळा

**शालेय वाहतुकीत कोणताही नियमभंग अथवा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नसल्याचे स्पष्ट करत संबंधितांवर कठोर दंडात्मक कारवाईचा इशारा दिला. वाहनाच्या क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थ्यांची वाहतूक न करणे, वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करणे आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.**

**-वैभव पाटील, जिल्हा वाहतूक शाखा प्रभारी पोलीस निरीक्षक**

घालता येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच ऑगस्ट महिन्यापासून बीड शहरातील सर्व शाळा व महाविद्यालयांमध्ये रस्ता सुरक्षा प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात येणार असल्याची घोषणाही त्यांनी केली.

मोटार वाहन निरीक्षक रणजीत पाटील यांनी शालेय वाहतूक करणार्या वाहनांची नियमित फिटनेस तपासणी, वैध परवाना व बॅजधारक चालकांकडूनच विद्यार्थ्यांची वाहतूक करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. मुख्याध्यापकांनी पालक, चालक आणि अटेंडंट यांच्याशी सातत्याने समन्वय ठेवून वाहतूक व्यवस्थेचा नियमित आढावा घ्यावा, असे त्यांनी सांगितले. चंपावती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती कुलकर्णी यांनी त्यांच्या शाळेत शासनाच्या निर्देशानुसार विद्यार्थी पान ३ वर

# विभाग नियंत्रक अनुजा दुसाने यांची दमदार कामगिरी

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातील बीड जिल्हा बीड विभाग नियंत्रक अनुजा दुसाने यांच्या कार्यकाळात बीड मधील मांजरसुंबा नेकनूर बीड येथील बस स्थानकाचे काम सुसज्ज व स्वच्छता युक्त झाले आहे व होत आहे सध्या बीड व नेकनूर चे काम पूर्ण झालेले आहे तथापि मांजरसुंबा येथील काम पूर्णतत्त्वास येत आहे येथील प्रवासी व नागरिकांतून चांगल्या प्रतिक्रिया येत आहेत स्वच्छता पण उत्कृष्टरित्या होत आहे त्यामुळे प्रवाशातून समाधान व्यक्त होत आहे गेल्या वर्षाच्या तुलनेत ह्या वर्षी शालेय विद्यार्थ्यांसाठी गावापासून शाळेपर्यंत एसटी बसची सोय ची संख्या वाढत आहे

तसेच चौसाळा बस स्थानकावर स्वच्छतेसाठी बोरवेल घेऊन दिल्यास येथील बस स्थानकाला पुढील काळात पाण्याची गैरसोय होणार नाही. सदर चौसाळा वाहतूक नियंत्रण कक्ष हा पावसाळ्यात गळत असल्याने गैरसोयीचा होत असल्याने व ती जागा अपुरी पडत असल्याने त्याचे नवीन स्वरूपात करून देण्यात यावे असेच प्रवासी निवारा शेड चे हे खूप अपुर असल्याने विद्यार्थी व महिला वृद्ध प्रवासी यांची गर्दी झाल्यास बसण्यास अपुरे पडते व त्यांना पावसात उभा राहण्यास भाग पडते त्यामुळे हे प्रवासी निवारा शेड मोठ्या स्वरूपात करून देण्यात यावे तसेच चौसाळा बस स्थानकात पहाटे ५.३० पासून संध्याकाळी १२ वाजेपर्यंत सोलापूर संभाजीनगर या शहराच्या येणाऱ्या जाणाऱ्या गाड्यांची आवक जावक व मुंबई पुणे कोल्हापूर सातारा सांगली या लांब पल्ल्याच्या गाड्या येथून धावतात तथापि रात्री ८.३० ते ९ पर्यंत जास्त गर्दीच्या गाड्या म्हणजे कोल्हापूर व पुणे मुंबई चे प्रवासी या स्थानकावर उभे असतात पण वाहतूक नियंत्रण हे ६ पर्यंतच उपलब्ध असते ते २ शिफ्ट मध्ये केल्यास महिला व विद्यार्थी यांचे सोय होईल व वाहतूक नियंत्रणाचे काम सुरू राहील

# सुभाष रोडवरील नाल्याची डॉ.सारिकाताई क्षीरसागरांकडून पाहणी

## तत्काळ स्वच्छता करण्याच्या बीड न.प.प्रशासनाला सूचना

बीड । प्रतिनिधी

शहरातील प्रमुख व्यापारी बाजारपेठ असलेल्या सुभाष रोड परिसराला भाजपच्या गटनेत्या तथा नगरसेविका डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी रविवारी (दि.५) भेट देऊन येथील स्वच्छता व्यवस्थेची पाहणी केली. यावेळी त्यांनी व्यापाऱ्यांसह नागरिकांशी संवाद साधत परिसरातील समस्यांची माहिती घेतली. मान्सूनपूर्व स्वच्छतेच्या कामात मोठ्या नाल्याची सफाई न झाल्याने मोठ्या प्रमाणात कचरा साचून नाला तुंबल्याचा आरोप त्यांनी केला.

यावेळी बोलताना डॉ.सारिकाताई क्षीरसागर म्हणाल्या की, जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या बीड शहरातील सुभाष रोड ही सर्वात महत्त्वाची व्यापारी बाजारपेठ असून येथे दिवसभर नागरिकांची मोठी वर्दळ असते. असे असतानाही परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले असून नाल्यांची स्वच्छता न झाल्यामुळे नागरिक व व्यापाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. स्वच्छतेच्या नावाखाली लाखो रुपयांची निविदा काढण्यात आली असली तरी प्रत्यक्षात कामाचा दर्जा समाधानकारक नसल्याचे या पाहणीतून झाल्याचा आरोप त्यांनी केला. नगरसेवकांसमवेत प्रत्यक्ष पाहणी केली असून या प्रश्नाचा सातत्याने पाठपुरावा करून नाल्यांची स्वच्छता करून घेणार आहोत. मात्र स्वच्छतेबाबत झालेल्या दुर्लक्षाची नोंद बीडकर निश्चितच घेतील आणि सत्ताधाऱ्यांना याची जाणीव करून दिली जाईल, असेही डॉ.क्षीरसागर यांनी सांगितले. यानंतर त्यांनी सहयोगनगर परिसरातील स्वच्छता कामांचीही पाहणी करून संबंधित यंत्रणेकडे आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी केली.



या पाहणी दौऱ्यात नगरसेवक शुभम धुत, नगरसेवक नितीन साखरे, नगरसेवक राहुल गुरखुदे, प्रकाश कानगावकर, शुभम कातांगळे, शारेख जकेरिया, शरद बडगे आदी उपस्थित होते.

# आ.विजयसिंह पंडित यांनी केली रस्ता आणि नाली कामाची पाहणी

## सर्व काम क्वॉलिटीचे करा, झाडे लावण्यासाठी रिंग टाका, पाणी मारण्यावर भर देण्याच्या सूचना

बीड । प्रतिनिधी

आ.विजयसिंह पंडित यांनी आज दुपारी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक (शिवतिर्थ) ते नगर पालिकेपर्यंत सुरू असलेल्या रस्ता आणि नाली कामाची पाहणी केली.

यावेळी त्यांच्यासमवेत नगराध्यक्ष प्रतिनिधी शेख मुजीब, सभापती शेख निजाम, गटनेते फारूख पटेल, नगरसेवक अशफाक इनामदार, सय्यद सादेकुजमा, खय्युम इनामदार, शेख बिलाल, वकील सर, नगरसेवक सय्यद इलियास, भागवत तावरे, बरकत पठाण, सिताई कन्स्ट्रक्शनचे रंजित क्षीरसागर नतीन जोगदंड आदिंची उपस्थिती होती. यावेळी आ.विजयसिंह पंडित यांनी रस्त्याच्या कामासह नाली बांधकामाची पाहणी केली. जिथे जिथे होईल तेवढ्या जागेवर रिंग टाकून झाडे लावण्यासाठी जास्त स्कोप ठेवा, कामे क्वालिटीची करा आणि काँक्रिटीकरण झाल्यानंतर त्या कामावर पाणी मारण्यावर जास्त भर द्या अशा सुचना त्यांनी गुत्तेदाराला दिल्या. दरम्यान रस्त्याच्या कामाची सर्व माहिती दर्शविणारे मोठे बॅनर कामाच्या ठिकाणी लावल्याचे पाहुन आ.विजयसिंह पंडित यांनी नगर पालिकेचे कौतूक केले. प्रत्येक बाब या बॅनरवर दाखवण्यात आली आहे. नागरीकांना याची माहिती घेण्यासाठी इतर ठिकाणी जाण्याची गरज नसल्याचे त्यांनी सांगितले.





# सरपंच मयुर आंधळे यांच्या तिरुमला कार्यालयाला पानिपतकार विश्वास पाटील यांची भेट

### आंधळे परिवाराच्या वतीने हदयपूर्वक सत्कार

वडवणी । प्रतिनिधी

ज्येष्ठ साहित्यिक व लेखक, मुंबई उपनगर जिल्ह्याचे माजी जिल्हाधिकारी आणि पानिपतकार विश्वासजी पाटील साहेब व रुई गांवचे आदर्श सरपंच अँड. मयूर आंधळे यांची द ग्रेट भेट झाली. यावेळी विविध प्रश्नावर व घडत असलेल्या घडामोडीवर प्रदीर्घ चर्चा झाली. वडवणीच्या तिरूमला कार्यालयात हा भेटीचा योग संपन्न झाला. यावेळी माजी आमदार केशवराव आंधळे यांच्या कुटुंबीयांच्या वतीने सिनेअभिनेते तथा उद्योजक शंकरअण्णा आंधळे व अँड. मयूर आंधळे यांच्या वतीने विश्वासजी पाटील यांचा हदयपूर्वक सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उद्योजक तथा सामाजिक कार्यकर्ते रामराव काका गीते यांची विशेष उपस्थिती होती. याबाबत अधिक माहिती अशी की, ज्येष्ठ साहित्यिक लेखक व प्रसिद्ध पानिपतकार माजी जिल्हाधिकारी विश्वासजी पाटील साहेब हे काल वडवणी भागाच्या दौ-यावर होते. यादरम्यान त्यांची रुई गावचे आदर्श सरपंच अँड. मयूर आंधळे यांच्या तिरूमला कार्यालयावर द ग्रेट भेट झाली. अँड. मयूर आंधळे यांचे गाव विकासा विषयी असलेली तळमळ व करत असलेले कार्य पाहून लेखक विश्वास पाटील हे देखील भारावून गेले. गावाविषयी व गावात केलेली विकासात्मक कामांची माहिती विश्वास पाटील साहेब यांना यावेळी देण्यात आली. तर मयूर आंधळे यांच्या सार्वजनिक व शैक्षणिक जीवनात विश्वास पाटील यांनी लिहिलेल्या कादंबऱ्या व साहित्यिक मोलाच्या ठरलेल्या आहेत. तर विश्वास पाटील हे मयूर आंधळे यांचे आवडते साहित्यिक आणि त्यांची काल प्रत्यक्ष भेट या भेटीने देखील अँड. मयूर आंधळे धन्य झाले आहेत. यावेळी माजी आमदार केशवराव आंधळे यांच्या परिवाराच्या वतीने ज्येष्ठ नेते तथा अभिनेते पान ३ वर



# संपादक कडबाने यांच्यावरील खोटा गुन्हा मागे घेण्याची पत्रकाराची मागणी

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सिरसाळा येथील 'दैनिक जगमित्र'चे संपादक बाळासाहेब कडभाणे यांच्यावर राज्य वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी यांच्या सांगण्यावरून दाखल करण्यात आलेला गुन्हा राजकीय सूडबुद्धीतून आणि पत्रकारांची मुस्कटदाबी करण्यासाठी असल्याचे सांगत, सिरसाळा पत्रकार संघाने या घटनेचा तीव्र निषेध नोंदवला आहे. या संदर्भात पत्रकार संघाने पोलीस महानिरीक्षकांना निवेदन दिले आहे.




दैनिक जगमित्रने काही दिवसांपूर्वी राज्य वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी यांच्या कार्यपद्धतीतील गैरप्रकार आणि भ्रष्टाचाराबाबत पुराव्यानिशी वृत्त प्रसिद्ध केले पान ३ वर

# पिट्ठी येथे वैराग्यमूर्ती सद्गुरू माणिक बाबा गिरी महाराज यांच्या मूर्तीप्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील पिठ्ठी (ता. पाटोदा) येथे वैराग्यमूर्ती सद्गुरू माणिक बाबा गिरी महाराज यांच्या मूर्तीप्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा रविवारी (दि. ५ जुलै) हजारो भाविकांच्या उपस्थितीत अत्यंत भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

वैराग्यमूर्ती सद्गुरू माणिक बाबा गिरी महाराज यांचा जन्म पिठ्ठी (ता. पाटोदा, जि. बीड) येथे कुडके कुटुंबात झाला. त्यांनी संपूर्ण आयुष्य हरिनाम प्रचार, गोसेवा, अन्नदान, दिंडी परंपरा आणि समाजप्रबोधनासाठी समर्पित केले.



त्यांच्या कार्यामुळे वारकरी संप्रदायाला नवी दिशा मिळाली. विशेष म्हणजे अहिल्यानगर जिल्ह्यात त्यांचा अत्यंत मोठा भक्तपरिवार असून, रामेश्वर आश्रमासह विविध ठिकाणी त्यांच्या कार्याचा प्रभाव आजही कायम आहे. राज्यभरातून हजारो भाविक त्यांच्या दर्शनासाठी व धार्मिक कार्यक्रमांसाठी नियमितपणे उपस्थित राहतात.

श्रीमंत सद्गुरू बाळू मामा यांच्या आशीर्वादाने तसेच श्रीमंत कुलभूषण नाद नारायण महाराज व ब्रह्मभूत रामचंद्र महाराज भारती यांच्या कृपेने आयोजित या सोहळ्यात वेदमंत्रांच्या घोषात मूर्तीप्राणप्रतिष्ठा, कलशारोहण, होमहवन, हरिनाम, भजन-कीर्तन व महाप्रसादाचा कार्यक्रम संपन्न झाला.या प्रसंगी श्री ह.भ.प. महंत दत्त गिरी महाराज (श्रीक्षेत्र राहुरी उत्तराधिकारी), श्री ह.भ.प. महंत रामदास महाराज भारती (श्रीक्षेत्र रामचंद्रगड, निंबळवाडी), श्री ह.भ.प. रामकृष्ण बापू रेखे (पाडोळी) तसेच श्री ह.भ.प. शिवाजी महाराज येवले (श्रीक्षेत्र हनुमान टेकडी) यांनी उपस्थित राहून भाविकांना आशीर्वाद दिले. कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अ‍ॅड. प्रकाश दादा कवठेकर, पान ३ वर

# आदित्य डेंटल कॉलेजमध्ये राष्ट्रीय सार्वजनिक आरोग्य दंतचिकित्सा दिन उत्साहात

## दंत आरोग्याविषयी जनजागृती करत समाजात आनंदी व निरामय जीवन जगण्याचा संदेश; विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग

बीड । प्रतिनिधी

समाजात मुख आणि दंत आरोग्याविषयी व्यापक जागरूकता निर्माण करून सर्वांनी आनंदी,निरामय आणि सकारात्मक जीवन जगणे गरजेचे आहे, याच उद्देशाला समोर ठेवून बीड येथील आदित्य डेंटल कॉलेजमध्ये 'राष्ट्रीय सार्वजनिक आरोग्य दंतचिकित्सा दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.महाविद्यालयात दिवसभर विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. अदिती सारडा यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. हिमांशू श्रीवास्तव, क्लिनिकल इन्चार्ज डॉ. समीरा कुरेशी आणि सार्वजनिक आरोग्य दंतचिकित्सा विभागाचे प्रमुख प्राध्यापक उपस्थित होते.

सार्वजनिक आरोग्य दंतचिकित्सेचे महत्त्व समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक सहभाग वाढविण्यासाठी दिवसभर विविध उपक्रम राबवण्यात आले. यामध्ये तोंडाचे आरोग्य तपासणी शिबिर, विशेष प्रश्नमंजुषा स्पर्धा, दंत आरोग्याविषयी जनजागृती मोहीम असे उपक्रम राबवण्यात आले. या उपक्रमामुळे आम्हाला नवीन व्यावहारिक ज्ञान मिळाले असून आमचा आत्मविश्वास वाढण्यास मोठी मदत झाली, अशा भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या. डॉ. मंगेश अंधारे यांनी आभार मानले. यावेळी उपप्राचार्य डॉ. हिमांशू श्रीवास्तव, क्लिनिकल इन्चार्ज डॉ. समीरा कुरेशी, डॉ. अभिजीत मोहखेडकर, डॉ. हरि कुमार मेम्पल्ली , डॉ. अमित हांडा, डॉ. निखत, डॉ. मंगेश अंधारे, डॉ. प्रांजल लिंबगावकर, डॉ. मयूर आवचार, डॉ. सुजाता सतोसकर, डॉ. सुमैया, डॉ. मोनिका, डॉ. दीप्ती, डॉ. फरहाना, डॉ. तेजस्विनी जायभाय, डॉ. वैभवी पवार आदी उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य दंतचिकित्सा विभागातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी तसेच आदित्य डेंटल कॉलेजच्या प्रशासनाने विशेष परिश्रम घेतले.

विद्यार्थ्यांनी ज्ञानाचा उपयोग समाजहितासाठी करावा- डॉ. आदिती सारडा

विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न राहता शैक्षणिक तसेच सहशालेय उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा. अशा कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांना आपली कौशल्ये प्रदर्शित करण्याची, ज्ञान वाढवण्याची आणि आत्मविश्वास विकसित करण्याची संधी मिळते. प्रत्येकाने आपल्या व्यावसायिक आयुष्यात उत्कृष्टता प्राप्त करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहावे. आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजहितासाठी करावे असे आवाहन डॉ. अदिती सारडा यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले.

# राज्य गुणवत्ता यादीत ८ वा क्रमांक कु. प्रांजल पोकळे शिष्यवृत्ती धारक

**आष्टी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे आयोजित पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ (इयत्ता ५ वी) मध्ये वसुंधरा प्राथमिक विद्यालय, आष्टी येथील विद्यार्थिनी कु. प्रांजल जालिंदर पोकळे हिने ३०० पैकी २८० गुण (९३.३३३३ टक्के) प्राप्त करून राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत ८ वा क्रमांक मिळवला आहे. या उल्लेखनीय यशामुळे ती शिष्यवृत्ती धारक ठरली आहे.



कु. प्रांजलच्या या यशामागे तिची खडतर मेहनत, जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण अभ्यास याबरोबरच वर्गशिक्षिका श्रीमती कर्डिले मॅडम यांचे परिश्रम तसेच संस्थेचे अध्यक्ष श्री मनोरंजन धस यांचे वेळोवेळी लाभलेले मोलाचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. तिच्या या दैदिप्यमान यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री मनोरंजन धस, वर्गशिक्षिका श्रीमती कर्डिले मॅडम, वसुंधरा प्राथमिक विद्यालय, आष्टी येथील सर्व शिक्षक, नातेवाईक व हितचिंतकांनी तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला. तसेच तिचे मामा श्री विठ्ठल आजबे व नातेवाईकांनी तिचा विशेष सत्कार करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कु. प्रांजलचे वडील जालिंदर ब. पोकळे हे न्यायालयात कार्यरत असून, आई शिक्षिका आहेत. आपल्या मुलीच्या या यशाबद्दल त्यांनी संस्थेचे अध्यक्ष श्री मनोरंजन धस, वर्गशिक्षिका श्रीमती कर्डिले मॅडम, तसेच वसुंधरा प्राथमिक विद्यालय, आष्टी येथील सर्व शिक्षकांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले. तसेच भविष्यातही प्रांजलने अशीच यशस्वी वाटचाल करून गाव व जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26